सांध्य दैनिक
# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - ३ रे ❑ अंक - ११७ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ शुक्रवार दि. ३० मे २०२५ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

## '...तर पाकिस्तानचे ४ तुकडे झाले असते' - राजनाथ सिंह

### आयएनएस विक्रांतवरुन पाकिस्तानला दिला थेट इशारा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०नवी दिल्ली**



पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर भारताने ऑपरेशन सिंदूरद्वारे पाकिस्तानला त्यांच्याच शब्दात धडा शिकवला. या ऑपरेशनमध्ये भारतीय हवाई दलाने महत्त्वाची भूमिका बजावली होती. दरम्यान, आता संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी नौदलाबाबत एक मोठा खुलासा केला आहे. संरक्षण मंत्री आज नौदलाचे लढाऊ जहाज आयएनएस विक्रांतवर गेले होते. यावेळी त्यांनी नौदल अधिकाऱ्यांची भेट घेतली आणि नौदलाबद्दल महत्त्वाची माहिती दिली.

संरक्षण मंत्री राजनाथ सिंह म्हणाले, ऑपरेशन सिंदूर अद्याप संपलेले नाही. जर पाकिस्तानने काही चूक केली तर यावेळी त्याला सावरण्याची संधीही मिळणार नाही. आमचे नौदल त्सुनामी आणू शकते. पाकिस्तानला असे उत्तर देऊ की, त्याने कधी विचारही केला नसेल. पाकिस्तान वारंवार चर्चेचा प्रस्ताव देत आहे. कालच पाकिस्तानी पंतप्रधान चर्चेबद्दल बोलले. पण, आमची स्पष्ट भूमिका आहे की, यापुढे फक्त दहशतवाद आणि पीओकेवरच चर्चा होणार. राजनाथ सिंह पुढे म्हणाले की, पाकिस्तानने हाफिज सईद आणि मसूद अझहरला भारताच्या स्वाधीन करावे. हाफिज सईद मुंबई हल्ल्यात सहभागी होता आणि त्याला जबाबदार धरले जाईल. दहशतवादाविरुद्ध आम्ही अशी कारवाई करू, ज्याचा पाकिस्तान विचारही करू शकत नाही. यावेळी जर पाकिस्तानने पुन्हा काही आपल्या कुरापती सुरू केल्या, तर नौदल देखील युद्धात उतरेल अन् मग पाकिस्तानचे काय होईल, हे देवालाच माहिती. १९७१ मध्ये जेव्हा नौदल आले होते, तेव्हा पाकिस्तानचे २ तुकडे झाले होते. आता ऑपरेशन सिंदूरमध्ये नौदल आले असते, तर पाकिस्तानचे ४ तुकडे झाले असते, असा मोठा दावाही त्यांनी यावेळी केला.

## आयपीएल स्टार वैभव सूर्यवंशीने घेतली पंतप्रधान मोदींची भेट

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०पटना**



आयपीएल स्पर्धेच्या इतिहासात सर्वात कमी वयात शतक झळकवणारा राजस्थान रॉयल्सचा खेळाडू वैभव सुर्यवंशी याची पटना विमानतळावर देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भेट घेतली आहे. यावेळी वैभव सुर्यवंशीचे कुटुंबही उपस्थित होते. या भेटीचे काही फोटो पंतप्रधान मोदींनी आपल्या एक्स अकाउंटवर शेअर केले आहे.

हे फोटो शेअर करताना पंतप्रधान मोदींनी लिहिले की, 'पाटणा विमानतळावर, तरुण क्रिकेटपटू वैभव सूर्यवंशी आणि त्याच्या कुटुंबाची भेट घेतली. त्याच्या क्रिकेट कौशल्याचे देशभर कौतुक होत आहे! त्याच्या भविष्यातील प्रयत्नांसाठी माझ्या शुभेच्छा.' या भेटीदरम्यान वैभव सुर्यवंशी याने पंतप्रधान मोदी यांचे पाय स्पर्श करत आशीर्वाद घेतले.

आयपीएल २०२५ मध्ये राजस्थान रॉयल्सने वैभव सुर्यवंशीला १.१ कोटी रुपये खर्च करून संघात घेतले होते. आयपीएल २०२५ मध्ये राजस्थान रॉयल्ससाठी खेळताना वैभव सुर्यवंशीने ७ सामन्यांमध्ये २०६.५६ च्या स्ट्राईक रेटसह २५२ धावा केल्या. या दरम्यान त्याने एक शतक आणि एक अर्धशतकही केले. वैभव आयपीएलच्या इतिहासात शतक करणारा सर्वात तरुण खेळाडूही ठरला आहे.

## प्रेमासाठी पोराला टाकून पाकिस्तानात गेलेली नागपूरची सुनीता चौकशीच्या फेऱ्यात अडकली

### २ जूनपर्यंत राहणार पोलीस कोठडीत

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०नागपूर**



नागपूरमधून लडाख फिरायला गेलेल्या महिलेने आपल्या १२ वर्षांच्या मुलाला गावातच सोडून सीमेपल्याड पाकिस्तानात पळून गेलेल्या महिलेला आता पाकिस्तानी रेंजर्सनी भारतात परत पाठवले आहे. मात्र, भारतात परतल्यानंतर आता ही महिला कायद्याच्या कचाट्यात अडकली आहे. भारतीय सुरक्षा दलाने सुनीताला नागपूर पोलिसांकडे सोपवले असून, आता तिला पोलिसांनी औपचारिकरित्या अटक केली आहे.

बुधवारी रात्री सुनीताला विशेष न्यायालयात हजर करण्यात आले असतं, तिला २ जूनपर्यंत पोलीस कोठडी ठोठावण्यात आली आहे. अमृतसर पोलिसांनी दाखल केलेल्या एफआयआरच्या आधारे ही कारवाई करण्यात आली असून, सदर प्रकरणाचा तपास सध्या कपिलनगर पोलीस ठाण्याच्या कार्यक्षेत्रात सुरू आहे. झोन ५चे पोलीस उपायुक्त निकेतन कदम यांनी यासंदर्भात माहिती दिली.

सुनीता जमगडे यांना अटक केल्यानंतर नागपूर पोलिसांच्या चार सदस्यीय पथकाने अमृतसर पोलिसांकडून ताबा घेतला. सुनीताला घेऊन हे पथक मंगळवारी रात्री ट्रेनने दिल्लीमार्गे नागपूरकडे रवाना झाले. तत्पूर्वी, शनिवारी पाकिस्तान प्रशासनाने तिला अटारी सीमेवरून भारतीय सुरक्षा दलाच्या स्वाधीन केले होते.

तपासातील अधिकाऱ्यांनुसार, सुनीताने पाकिस्तानात वास्तव्यास असताना काही व्यक्तींशी संपर्कात राहत, विविध प्रकारची माहिती शेअर केली असण्याची शक्यता आहे. विशेषतः झुल्फिकार आणि पास्टर या पाकिस्तानी नागरिकांशी झालेल्या संवादाबाबत चौकशी करण्यात येणार आहे.

सुनीता जमगडे ही नागपूरच्या संत कबीरनगर परिसरातील रहिवासी असून, तिने ४ मे रोजी आपल्या १२ वर्षीय मुलासह कारगिल फिरण्याची योजना बनवली होती. पोलिसांच्या माहितीनुसार, १४ मे रोजी तिने नियंत्रण रेषा ओलांडून पाकिस्तानात प्रवेश केला. विशेष बाब म्हणजे सीमा ओलांडण्यापूर्वीच तिने तिच्या मुलाला मागे सोडले होते. पाकिस्तानात प्रवेश केल्यानंतर सुनीताला तिथल्या सुरक्षा दलाने पकडले. अधिकृत कारवाईनंतर सुनीताचा ताबा भारताकडे सोपवण्यात आला आहे.

## ढेकळांचे पंचनामे करायचे का? कृषीमंत्री कोकाटेंची वक्तव्यावर सारवासारव

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०नाशिक**



राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते आणि राज्याचे कृषीमंत्री माणिकराव कोकाटे हे पुन्हा एकदा एकदा आपल्या वादग्रस्त विधानामुळे चर्चेत आले आहे. हार्वेस्टिंग झालेल्या पिकांचे पंचनामे करून काय करणार? ढेकळांचे पंचनामे करायचे का? असं वक्तव्य माणिकराव कोकाटे यांनी केलं आहे. नाशिक जिल्ह्यातील सिन्नर तालुक्यातील पांढुर्ली गावात अवकाळी पावसामुळे झालेल्या नुकसानीची पाहणी करण्यासाठी गेल्यानंतर कृषीमंत्री कोकाटे पत्रकारांशी बोलत होते. त्यावेळी त्यांनी हे वक्तव्य केलं आहे. या वक्तव्यानंतर पुन्हा एकदा कृषीमंत्र्यांवरती टीका होऊ लागली आहे. दरम्यान, कोकाटेंनी आपल्या वक्तव्यावर स्पष्टीकरण दिलं आहे. मी तसं बोललोच नाही असं माणिकराव कोकाटे यांनी म्हटलं आहे.

#### नेमकं काय म्हणाले कोकाटे?

स्पष्टीकरण देताना माणिकराव कोकाटे म्हणाले, मी तसं बोललोच नाही, बऱ्याच ठिकाणी पेरणी संपली आहे. फळबागाचे नुकसान झाले आहेत. त्यामुळे फळबागाचे पंचनामे करण्याचे सांगितले आहे. काही ठिकाणी कांद्याची लागवड केल्याने, कांद्याचे नुकसान झाला आहे. बऱ्याच ठिकाणी शेतीमध्ये शेतीमध्ये माल कमी आहे. जेवढं नुकसान झाला आहे, तेवढे पंचनामे करण्याचे सांगितले असून, नुकसान भरपाई देणार आहे. काही ठिकाणी शेतकऱ्यांनी नांगरलं आहे, शेतीची मशागत करण्यासाठी नांगरटी करावीच लागते. आता सोयाबीन, कापूस शिल्लक आहे का?, त्यामुळे फळबागा उभा आहेत, त्या महत्त्वाच्या आहेत असं कोकाटे म्हणालेत.

## सरकारी कर्मचारी असलेल्या २,६५२ 'लाडक्या बहिणीं'नी घेतला योजनेचा लाभ

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०मुंबई**



महायुतीने विधानसभा निवडणुकीपूर्वी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण ही योजना आणली. या योजनेला महाराष्ट्रात अभूतपूर्व असा प्रतिसाद मिळाला आहे. किंबहुना या योजनेमुळेच महायुती पुन्हा एकदा सत्तेत आल्याचं बोललं जातंय. दरम्यान, या योजनेत काही महिन्यांपूर्वी गैरप्रकार घडल्याचं समोर आलं होतं. बोगस अर्ज दाखल करून या योजनेतील लाभ घेतल्याचे प्रकार समोर आले होते. यानंतर आता सरकारी कर्मचारी असलेल्या २,६५२ लाडक्या बहिणींनी या योजनेवर डल्ला मारल्याची धक्कादायक माहिती समोर आलीय.

दरम्यान, जुलै २०२४ पासून ही योजना अंमलात आणली गेली. प्रत्येकी महिन्याला दीड हजार रुपये याप्रमाणे सरकार लाडक्या बहिणींच्या खात्यात पैसे जमा करीत आहे. या योजनेत जे नियम आणि निकष आहेत, त्या नियमात न बसणाऱ्या महिलांनीही या योजनेचा लाभ घेतल्याचं काही महिन्यांपूर्वी निदर्शनास आलं होतं. २.५० लाखांच्या वर वार्षिक उत्पन्न, घरी चारचाकी गाडी, तसेच कुटुंबातील व्यक्ती शासकीय नोकरीत नको, असे सरकारचे या योजनेतील नियम आणि निकष सांगताहेत. मात्र असे असतानाही या योजनेत २,६५२ लाडक्या बहिणींनी योजनेचा लाभ घेतल्याची माहिती समोर आलीय. त्यामुळे आता सरकार अधिक सतर्क झाले असून, या योजनेतून शासकीय कर्मचाऱ्यांनी घेतलेला लाभ तपासण्यासाठी अजून ६ लाख लाभार्थ्यांची पडताळणी होणार असल्याची माहिती समोर आली आहे. जानेवारी, फेब्रुवारी आणि मार्च महिन्यात एकूण ९ लाख महिलांना या योजनेतून विविध कारणामुळं अपात्र करण्यात आलं होतं. दरम्यान, या योजनेत किती शासकीय महिलांनी लाभ घेतला, हे तपासण्यासाठी मोहीम घेण्यात आली होती. त्यातून २,६५२ शासकीय महिला कर्मचाऱ्यांच्या बँक खात्यात या योजनेतील पैसे थेट जमा झाल्याचे आढळून आलंय. म्हणजे या सर्व महिलांनी गेल्या ९ महिन्यांपासून १३ हजार ५०० रुपये घेतल्याचं समोर आलंय. या महिलांनी घेतलेल्या एकूण पैशाची रक्कम ३ कोटी ५८ लाख रुपये एवढी होती.

विशेष म्हणजे लाडकी बहीण योजनेत लाभ घेतलेल्या शासकीय कर्मचारी महिला या वर्ग ३ आणि वर्ग ४ मधील आहेत. धक्कादायक म्हणजे ८ लाख ८५ हजार महिलांनी चक्क दोन योजनांचा लाभ घेतल्याचंही समोर आलंय. लाडकी बहीण योजना आणि नमो शेतकरी योजना या दोन्ही योजनांचा लाभ ८ लाख ८५ हजार महिलांनी घेतल्याचे समोर आलंय. त्यामुळं आता सरकार या महिलांवर कोणती कारवाई करणार हे पाहणं महत्त्वाचं ठरणार आहे.

## ठाकरेंना मोठा धक्का बसणार? सांगलीचा पैलवानच साथ सोडणार; पडद्यामागं काय घडतंय

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०सांगली**



राज्यात विधानसभा निवडणुकीतील पराभवानंतर महाविकास आघाडीला धक्क्यांवर धक्के बसत आहेत. आघाडीतील तिन्ही पक्षांना गळती लागली आहे. याचा सर्वाधिक फटका ठाकरे गटाला बसत आहे. आतापर्यंत अनेक दिग्गज नेते, कट्टर शिवसैनिक, माजी आमदार आणि पदाधिकाऱ्यांनी ठाकरेंची साथ सोडली आहे. आताही आणखी एक धक्का सांगलीत बसण्याची चिन्हे आहेत. चंद्रहार पाटील उद्धव ठाकरेंची शिवसेना सोडणार असल्याचे सांगण्यात येत आहे. उद्योगमंत्री उदय सामंत यांनी तसे संकेत दिले आहेत.

सांगली येथील कार्यक्रमात चंद्रहार पाटील यांनी उदय सामंत यांची भेट घेतली होती. त्यांचा सत्कारही केला. यानंतर पाटील लवकरच शिंदे गटात प्रवेश करतील अशी चर्चा सुरू झाली आहे. चंद्रहार पाटील यांनी आमच्या गळ्यात हार घातला पण चंद्रहार पाटील यांच्या गळ्यात एकनाथ शिंदे कधी हार घालणार हे पाटील यांनीच ठरवावं असे सूचक वक्तव्य मंत्री सामंत यांनी केलं. लोकसभा निवडणुकीत याच चंद्रहार पाटील यांच्यासाठी ठाकरेंनी काँग्रेस बरोबर वाद घातला होता.

या मतदारसंघात काँग्रेसच्या विशाल पाटील यांनी बंडखोरी केली होती. अपक्ष म्हणून त्यांनी निवडणूक लढवली आणि विजयी सुद्धा झाले. महाविकास आघाडी म्हणून काँग्रेसने आपली ताकद चंद्रहार पाटील यांच्या मागे उभी करणे गरजेचे होते. परंतु, तसे काही झाले नाही. या निवडणुकीत चंद्रहार पाटील पराभूत झाले होते. आता हेच पाटील ठाकरेंची साथ सोडून जाणार असल्याची परिस्थिती निर्माण झाली आहे. उदय सामंत यांच्याबरोबरील बैठकीने त्यांच्या पक्षांतराच्या चर्चांना बळ मिळाले आहे.

## 'जिथे जुळणार नाही, तिथे मैत्रीपूर्ण लढत', या बावनकुळेंच्या वक्तव्याने महायुतीमध्ये संभ्रम?

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०नागपूर**



सुप्रीम कोर्टाने चार महिन्याच्या आत स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका घेण्याचे आदेश दिले आहेत. त्यामुळे आता सर्वच पक्षाने निवडणुकीची तयारी सुरु केली आहे. महायुतीमध्ये निवडणूक एकत्रित लढविण्यावरून मतभेद असल्याचे पुढे आले आहे.

भाजपकडून स्वबळाची तयारी केली जात असताना अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसने स्वबळावर निवडणुका लढविण्याऐवजी मत विभागणी टाळण्यासाठी एकत्रित निवडणुका लढविणार असल्याचे स्पष्ट केले आहे. त्यामुळे महायुती काय निर्णय घेणार? याकडे लक्ष लागले असतानाच आता भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी 'जिथे जुळणार नाही, तिथे मैत्रीपूर्ण लढत' असे वक्तव्य केले आहे. त्यामुळे महायुतीमध्ये संभ्रम निर्माण झाला आहे.

राज्यात आता स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीचे वारे वाहू लागले आहे. त्या त्यादृष्टीने महायुती आणि महाविकास आघाडीच्या घटक पक्षाकडून निवडणुकीची तयारी सुरू झाली आहे. राज्यात गेल्या तीन वर्षापासून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका रखडल्या होत्या.

गेल्या वर्षी लोकसभा व विधानसभेच्या निवडणूका पार पडल्या. त्यामध्ये लोकसभेला महाविकास आघाडीला यश मिळाले तर विधानसभा निवडणुकीत महायुतीने घवघवीत यश मिळवले. त्यामुळे आगामी काळात होत असलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत कोण बाजी मारणार? याची उत्सुकता लागली आहे.चार दिवसापूर्वीच केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी राज्याचा दौरा केला. या दौऱ्यावेळी त्यांनी भाजपच्या नेतेमंडळींच्या बैठका घेत आगामी काळात होत असलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीच्या अनुषंगाने चाचपणी केली आहे.

## संपादकीय ......

# चीन हाच खरा शत्रू

*शांततामय संबंध राहण्यासाठी भारत आणि चीनमध्ये २९ एप्रिल १९५४ रोजी बीजिंगमध्ये पंचशील करार केला. यामध्ये शांततामय सहजीवनाच्या पाच मूलभूत तत्त्वांचा समावेश असल्यामुळे त्याला 'पंचशील' संबोधले गेले. उभय देशांची प्रादेशिक एकात्मता आणि सार्वभौमत्वाचा आदर, परस्परांच्या अंतर्गत व्यवहारांत हस्तक्षेप न करणे, परस्परांचे हितरक्षण आणि शांततामय सहजीवन या तत्त्वांचा त्यात समावेश होता. 'हिंदी-चिनी भाई भाई' घोषणा कमालीची लोकप्रिय ठरली. १९४९ मध्ये माओत्से तुंग यांच्या नेतृत्वाखाली चीनमध्ये क्रांती घडून चँग के शेक यांचे सरकार उलथवले गेले. तेव्हाही भारताने या नव्या कम्युनिस्ट सरकारसोबत मैत्री ठेवली होती.*

*चीनला मान्यता देणारा आशियातील भारत हा पहिला देश होता. भारताने १ एप्रिल १९५० रोजी चीनला मान्यता दिल्यानंतर इंडोनेशिया, ब्रह्मदेश (म्यानमार) आदी आशियातील देशांनी त्याला मान्यता दिली. संयुक्त राष्ट्रसंघात चीनला सदस्यत्व देण्याच्या प्रस्तावाला भारताने समर्थन दिले होते. बांडुंग येथे झालेल्या आशियाई परिषदेत चीनला सहभागी करून घेण्यातही पुढाकार घेतला होता. अशाप्रकारे चीनला आंतरराष्ट्रीय स्तरावर स्थान मिळावे, यासाठी भारताने खास प्रयत्न केले होते. या पार्श्वभूमीवर ऑक्टोबर १९५० मध्ये चीनने तिबेटवर आक्रमण करून कब्जा घेतल्याने भारताला धक्का बसला. कारण, भारताचे जसे चीनसोबत स्नेहपूर्ण संबंध होते, तसेच तिबेटसोबतही, तरीही तिबेटवरून चीनविरुद्ध संघर्षाचा पवित्र न घेता नेहरूंनी संयमाचे धोरण स्वीकारले.*

*१९५४ ते १९५६ या काळात नेहरू आणि चीनचे पंतप्रधान यांनी एकमेकांच्या देशांचे दौरे करून 'पंचशील'चा पुरस्कार केला; पण १९६२ मध्ये सीमा तंट्यावरून चीनने भारतावर आक्रमण करून पंचशील तत्त्वाची पायमल्ली केली, तेव्हा चीन किती विश्वासघातकी आहे, याचा प्रत्यय आला. पाच वर्षांपूर्वीही चीनने गलवान खोऱ्यात घुसखोरी केली. अरुणाचल प्रदेशला चीन सतत आपल्या नकाशात दाखवत असतो. आता भारत हा चीनला मुख्य शत्रू मानतो व पाकिस्तानकडे सुरक्षाव्यवस्थेपुढील प्रमुख धोका म्हणून पाहतो, असे निरीक्षण अमेरिकेच्या गुप्तचर यंत्रणेच्या जागतिक अहवालात नोंदवले आहे. 'वर्ल्डवाईड थ्रेट असेसमेंट रिपोर्ट २०२५' अहवालात भारतासाठी पाकिस्तान ही दुय्यम सुरक्षा समस्या आहे आणि चीन हाच भारताच्या दृष्टीने प्रमुख शत्रू आहे, असे म्हटले आहे.*

*भारत-पाकिस्तानात मे महिन्यात संघर्ष झाला असला, तरीही भारताच्या दृष्टीने पाकिस्तान त्याचा दुय्यम शत्रू असून, त्याला शिरजोर होऊ न देणे आवाक्यात आहे, असे भारत मानतो. २०२० पासून भारत आणि चीनमध्ये गलवान सीमेवर सुरू झालेला संघर्ष अद्याप संपलेला नाही. हिंदी महासागर क्षेत्रातील चिनी प्रभाव रोखण्यासाठी भारत प्रयत्न करील. चीनच्या वाढत्या प्रभावाला पायबंद घालण्यासाठी हिंदी महासागर क्षेत्रात द्विपक्षीय संरक्षण भागीदाऱ्या करण्यास आणि वैश्विक नेतृत्व म्हणून स्वतःला सिद्ध करण्यास भारत प्राधान्य देत आहे, अशी नोंद अमेरिकेच्या गुप्तचर संस्थेच्या या अहवालात करण्यात आली आहे. चीनला प्रतिशह देणे आणि लष्करी सामर्थ्यात वाढ करणे यावर येत्या काही वर्षांत पंतप्रधान नरेंद्र मोदी भर देतील, हा या अहवालातील अंदाज योग्यच म्हणावा लागेल.*

*चीनकडे ६००पेक्षा जास्त अण्वस्त्रे आहेत आणि येत्या पाच वर्षांत ही संख्या हजारवर जाईल. यातील बहुतेक अण्वस्त्रे तत्काळ वापरासाठी सज्ज असतील. चीन हा पाकिस्तान आणि उत्तर कोरियाला अण्वस्त्रे व क्षेपणास्त्रे बनवण्यासाठी मदत करत आहे. भारत आणि पाकिस्तानकडे प्रत्येकी १७०च्या आसपास अण्वस्त्रे आहेत. पाकिस्तान दिवाळखोर बनला असला, तरीही चीनकडून भीक मागून तो विनाशकारी शस्त्रे खरेदी करत आहे. भारताने संयुक्त राष्ट्रात पाकिस्तानस्थित लष्कर-ए-तोयबा आणि जैश-ए-मोहम्मद या संघटनांशी संबंधित पाच दहशतवाद्यांना 'जागतिक दहशतवादी' घोषित करण्यासाठी पाठवलेले प्रस्ताव चीनने पुन्हा रोखले आहेत.*

*पहलगाम हल्ल्यास जबाबदार असलेल्या द रेझिस्टन्स फ्रंटवर (टीआरएफ) बंदी घालण्याचा भारताचा संयुक्त राष्ट्रातील प्रस्तावही चीनने अडवला आहे. एकीकडे आंतरराष्ट्रीय व्यासपीठांवरून जगातील दहशतवाद संपुष्टात आणण्याच्या वल्गना करायच्या आणि दुसरीकडे पाकिस्तानसारख्या दहशतवादी देशाला पाठबळ पुरवायचे, ही चीनची दुहेरी नीती आहे. रशियाचे परराष्ट्रमंत्री सेर्गेई लावरोव गेल्या आठवड्यात म्हणाले होते की, पाश्चिमात्य देश भारत व चीनला एकमेकांविरोधात उभे करून तणाव वाढवत आहेत. पाश्चात्त्यांना एकध्रुवीय जग हवे आहे; पण रशिया आणि चीन पाश्चात्त्य देशांच्या नियंत्रणाखाली राहणार नाहीत.*

*या देशांचे प्रयत्न जे काही असतील ते असोत; पण चीन हा भारतविरोधी कारवाया करत आहे, हे लावरोव यांना माहीत नाही का? शिवाय चीनचा सामना करायचा असेल, तर भारताला रशियाची मदत होणार नाही. १९६२च्या युद्धात रशियाने भारताला मदत केली नव्हती. आज रशियाच चीनवर बऱ्यापैकी अवलंबून आहे. १९६२च्या युद्धाची सुरुवात झाल्यानंतर चीनने सोव्हिएत रशियाशी चर्चा केली होती; पण प्रत्यक्ष युद्ध सुरू झाले, तेव्हा सोव्हिएतचे अध्यक्ष निकिता क्रुश्चेव्ह तटस्थ राहिले होते. याचे स्मरण राम यांनी करून दिले आहे. अशावेळी भारताला अमेरिकेची मदत घेण्याशिवाय पर्याय राहिला नव्हता, तरीही आजही भारत रशियाच्या प्रभावातून बाहेर पडू शकला नाही, असे अमेरिकेला वाटते, तर भारत पाश्चात्त्य देशांसाठी चीनविरोधी प्यादे बनतो आहे, असे रशियाला वाटते.*

*अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या 'जशास तसे' कर धोरणांमुळे चीनला थोडाफार फटका बसेल आणि त्याचा भारताला लाभ होईल, अशी चर्चा आहे. त्यामुळे चीन अस्वस्थ आहे. आता जगातील चौथी अर्थव्यवस्था बनलेल्या भारताने चीनपुढे आव्हान निर्माण केले आहे. पाकिस्तानला हाताशी धरून चीनची कारस्थाने वाढतच जाणार आहेत. म्हणूनच चीनबाबत भारत गेल्या काही वर्षांपासून सावध असून, ते नैसर्गिकच मानावे लागेल. भारत आपल्या चीनविषयक धोरणावर किती ठाम आहे, हेच या अहवालावरून स्पष्ट होते.*

## मेळघाटच्या विकासासाठी महत्त्वाची पावले

# ३ जूनला होणार कृती आराखडा जाहीर सीईओंनी केला गावागावांत दौरा

**विदर्भ प्रजासत्ताक दि.३०अमरावती** – जिल्हा परिषदेच्या सीईओ संजीता महापात्र यांनी मेळघाटच्या विकासासाठी महत्त्वाची पावले उचलली आहेत. आगामी ३ जून रोजी धारणी आणि चिखलदरा पंचायत समितीच्या खंड विकास अधिकाऱ्यांसोबत बैठक होणार आहे. या बैठकीत मेळघाटच्या सर्वांगीण विकासाचा कृती आराखडा तयार केला जाणार आहे.






गेल्या शुक्रवारी सीईओ महापात्र यांनी संपूर्ण प्रशासकीय यंत्रणेसह मेळघाटचा दौरा केला. त्यांनी ३६ अधिकाऱ्यांना वेगवेगळ्या गावांमध्ये मुक्कामासाठी पाठवले. स्वतः त्या चिखलदरा तालुक्यातील कुटीदा या दुर्गम गावात थांबल्या. त्यांनी गावकऱ्यांची बैठक घेऊन समस्या जाणून घेतल्या आणि विकासाचा रोडमॅप तयार केला.

अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी प्रिती देशमुख बिच्चूखेडा येथे, डेप्युटी सीईओ बाळासाहेब बायस रेहट्याखेडा येथे तर बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता दिनेश गायकवाड कुही गावात मुक्कामी होते. लघुसिंचन विभागाचे सुनील जाधव बोराट्याखेडा येथे आणि जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी डॉ. पुरुषोत्तम सोळंके खडीमल येथे थांबले होते.

दौऱ्यानंतरच्या आढावा बैठकीत शिक्षण, आरोग्य, घरकुल, पशुसंवर्धन, वनहक्क आणि वनउपजांचा विनियोग यांसारख्या विषयांवर चर्चा झाली. रस्ते, पूल आणि शासकीय इमारतींच्या दुरुस्तीचाही आढावा घेण्यात आला. दोन्ही तालुक्यांच्या बीडीओंकडून सर्वंकष अहवाल मागवण्यात आला असून ३ जूनच्या बैठकीत त्यावर अंतिम निर्णय घेतले जाणार आहेत.

## रविवारी ज्येष्ठ नागरिकांसाठी सहाय्यक उपकरणे वाटप शिबीर

**विदर्भ प्रजासत्ताक दि.३० अमरावती,**जिल्ह्यातील तीन पंचायत समितीमधील ज्येष्ठ नागरिकांसाठी सहाय्यक उपकरणे वाटप करण्यात येणार आहे. यासाठी रविवार, दि. ३१ मे रोजी शिबीर आयोजित करण्यात आले आहे. जिल्ह्यातील ६० वर्षांवरील वयोवृद्ध नारिकांना सहाय्यक उपकरणांचे वाटप करण्यात येणार आहे. जिल्ह्यातील भातकुली, तिवसा, अमरावती पंचायत समितीने निवड केलेल्या लाभार्थ्यांना उपयुक्त कृत्रिम अवयव साधनांचे वाटप डॉ. नरेंद्र भिवापूरकर अंध विद्यालय, जेल क्वॉर्टरजवळ, कॅम्प, अमरावती येथे होणार आहे.




## यकृत निरोगी ठेवण्यासाठी आहारात 'ही' पेये असलीच पाहिजेत, जाणून जाणून घ्या सविस्तर....

**दि.३० विदर्भ प्रजासत्ताक**

जगभर दरवर्षी सुमारे २० लाख लोक यकृत विकारांमुळे मृत्युमुखी पडतात, जे एकूण मृत्यूंपैकी सुमारे ४% आहेत. यकृत हे शरीरातील सर्वात महत्त्वाचे अवयव असून ते ५०० हून अधिक कार्ये पार पाडते – जसे की पचन, विषारी पदार्थांचे विघटन, रक्त शुद्धीकरण, खनिज संचय आणि पित्त तयार करणे.

**कॉफी: यकृतासाठी लाभदायक पेय**

कॉफीमध्ये क्लोरोजेनिक ॲसिडसारखे अँटीऑक्सिडंट्स असतात जे यकृताच्या आरोग्यासाठी फायदेशीर आहेत. नियमित २ कप कॉफी प्याल्यास यकृत फायब्रॉसिस, नॉन-अल्कोहोलिक फॅटी लिव्हर डिसीज (N-FLD) आणि लिव्हर कॅन्सरचा धोका कमी होतो. डिकॅफिनेटेड कॉफी देखील तितकीच उपयुक्त आहे. मात्र, कॉफी साखर व क्रीमशिवाय पिणे अधिक फायदेशीर ठरते.

ग्रीन टी: यकृताचे संरक्षण करणारे पेय

ग्रीन टीमध्ये ईजीसीजी सारखे कैटेचिन्स आढळतात जे लिपिड मेटाबॉलिझम सुधारतात आणि यकृतातील चरबी साचण्यास प्रतिबंध करतात. याशिवाय, त्यातील पॉलीफेनोलिक अँटीऑक्सिडंट्स ऑक्सिडेटिव्ह स्ट्रेस कमी करून यकृताचे संरक्षण करतात. दिवसाला १-२ कप ग्रीन टी पिणे लाभदायक आहे.

**बीटरूट ज्यूस:** यकृताच्या सूजेला आराम



बीटरूट ज्यूसमध्ये नायट्रेट्स व बीटालाइन्ससारखे अँटीऑक्सिडंट्स असतात जे यकृतातील सूज आणि विषारी घटक दूर करण्यास मदत करतात. आठवड्यातून १-२ वेळा बीटरूट शॉट्स पिणे उपयुक्त असते. २०१९ च्या अभ्यासानुसार यकृताच्या सूजेला बीटरूट ज्यूसने आराम मिळतो.

**चहा (ओलोंग आणि डार्क टी): यकृतासाठी उपकारक**

२०२१ च्या अभ्यासानुसार ओलोंग टी आणि डार्क टी यकृतातील चरबी व सूज कमी करण्यात मदत करतात. तसेच, चहा पचन सुधारण्यात आणि गट मायक्रोबायोटा संतुलित ठेवण्यात उपयुक्त आहे. दिवसाला २-३ कप साखरविरहित चहा पिणे यकृतासाठी फायदेशीर ठरते.

# पावसाच्या पार्श्वभूमीवर शेती सल्ला: कोणती पिके, कधी पेरणी? वाचा सविस्तर

**दि.३० विदर्भ प्रजासत्ताक**

प्रादेशिक हवामान केंद्र, मुंबई व वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी यांच्या संयुक्त अंदाजानुसार मराठवाड्यात पुढील काही दिवसांत वादळी वाऱ्यासह हलक्या ते मुसळधार पावसाची शक्यता वर्तविण्यात आली आहे.

विदर्भ प्रजासत्ताक कृषी विशेष

शेतकरी ते थेट ग्राहक
**कामधेनु नॅचरल्स**
उत्तम आहार सर्वोत्तम जीवन
विषमुक्त फळे, भाजी व धान्य एकाच ठिकाणी
समर्थ हायस्कूल जवळ, अकोला अर्बन बँकेच्या बाजुने देवरणकर नगर, अमरावती
नंदकिशोर गांधी, मो. ७७२००७७५५०

या हवामान बदलाच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांनी योग्य पूर्वतयारी करणे आवश्यक आहे. या हवामान स्थितीच्या अनुषंगाने विविध पिकांची काळजी, पेरणीचा योग्य वेळ, पशुधनाची सुरक्षितता याबाबत तज्ज्ञांकडून मार्गदर्शन घेणे अत्यंत आवश्यक झाले आहे.

**हवामानाचा अंदाज**

२९ मे ते ३१ मे या कालावधीत मराठवाड्यात तुरळक ठिकाणी हलका ते मध्यम पाऊस आणि वादळी वाऱ्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे.

३० मे ते ५ जून या कालावधीत सरासरीपेक्षा जास्त पाऊस आणि तापमानात होणारी घट होणार आहे.

**महत्वाचा संदेश**

* हा पाऊस पूर्वमोसमी आहे. पेरणीची घाई अजिबात करू नको.
* काढणीस तयार पीक साठवून ठेवा, पावसात भिजणार नाही याची काळजी घ्या.

पीक व्यवस्थापन सल्ला

**कापूस** – नांगरणी नंतर मोगडणी करावी. मोगडणीनंतर २-३ वखराच्या पाळ्या द्याव्यात. शेवटची वखरणी करण्यापूर्वी कोरडवाहू कापूस लागवडीसाठी ५ टन व बागायती लागवडीसाठी १० टन चांगले कुजलेले शेणखत शेतात समप्रमाणात पसरावे. कापूस पिकाच्या लागवडीसाठी वाण निवडताना जमिन व हवामान, कोरडवाहू किंवा बागायती, लागवडीचा प्रकार व वाणांचे गुणधर्म यांचा विचार करून वाणांची निवड करावी.

**तूर**- तुर पिकाच्या पूर्व मशागतीसाठी वखराच्या २ ते ३ पाळ्या द्याव्यात. शेवटच्या पाळी अगोदर चांगले कुजलेले शेणखत किंवा कंपोस्ट खत हेक्टरी ५ टन जमिनीत मिसळून पाळी द्यावी.

* तुर पिकाच्या पेरणीसाठी बीडीएन-२०१३-४१(गोदावरी), बीडीएन-७११, बीएसएमआर-७३६, बीएसएमआर-८५३ (वैशाली), बीडीएन-७१६, बीडीएन-२, बीडीएन-७०८ (अमोल), एकेटी ८८११, पीकेव्ही तारा किंवा आयसीपीएल ८७११९ आदी वाणांचा वापर करावा.
* पावसाळ्यात तूर पिकावरील फायटोप्थोरा करपा टाळण्यासाठी, शेताच्या चारी बाजूस ३ फूट खोल आणि २ फूट रुंद चर काढावी जेणे करून अतिवृष्टी मध्ये शेतातील मातीची धूप होणार नाही व पिकाचे मुळे सडणार नाहीत. तसेच पुढे चरातील पाणी पाऊस ओसरल्यावर शेतातील पिकास परत कामी येईल.

**मुग/उडीद**- मुग/उडीद लागवडीसाठी कुळवाच्या २ पाळ्या द्याव्यात. शेवटच्या कुळवणी अगोदर चांगले कुजलेले शेणखत हेक्टरी ५ टन जमिनीत मिसळून पाळी द्यावी. मुग पेरणीसाठी कोपरगाव, बीएम-४, बीपीएमआर-१४५, बीएम-२००२-१, बीएम-२००३-२, फुले मुग २, पी.के.व्ही.ए.के.एम ४ आदी वाणांचा वापर करावा तर उडीद लागवडीसाठी बीडीयु-१, टीएयू-१, टीपीयू-४ आदी वाणांचा वापर करावा




**भुईमूग**-भुईमूगाच्या पेरणीसाठी वखराच्या २ ते ३ पाळ्या द्याव्यात. शेवटच्या वखरपाळी पुर्वी प्रति हेक्टरी १० गाड्या शेणखत/ कंपोस्ट खत पसरून जमिन भुसभूशीत करावी. भुईमूग पिकाच्या लागवडीसाठी एसबी-११, जेएल-२४, एलजीएन-२ (मांजरा), टीएजी-२४, टीजी-२६, टीएलजी-४५, एलजीएन-१, एलजीएन-१२३ आदी वाणांचा वापर करावा.

**मका**- वखराच्या १ ते २ पाळ्या देऊन जमिन तयार करावी.

* मका पिकाच्या पेरणीसाठी नवज्योत, मांजरा, डीएमएच-१०७, केएच-९४५१, एमएचएच, प्रभात, करवीर, जेके-२४९२, महाराजा, युवराज आदी वाणांचा वापर करावा.

**फळबाग सल्ला**

**केळी / आंबा / सिताफळ**

* लागवडीपूर्वी शेणखत + सुपर फॉस्फेट वापरून खड्डे भरावेत.
* लहान झाडांना वादळापासून संरक्षणासाठी काठीने आधार द्यावा.
* शासकीय रोपवाटीकेतूनच रोपे खरेदी करावीत.

**द्राक्ष** रोगग्रस्त पाने काढून फवारणी करावी.

**पशुधन सल्ला**-वादळी वाऱ्यामुळे जनावरे घरातच ठेवा.

* पावसापासून संरक्षणासाठी निवाऱ्याची व्यवस्था करा.
* स्वच्छ व पुरेसे पाणी उपलब्ध ठेवा.

**(सौजन्य: ग्रामीण कृषी मौसम सेवा, वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी)**

# जोर ओसरतोय, पेरणीची घाई नको, ५ ते ६ दिवस पावसाची तीव्रता कमी असेल

## गेला आठवडाभर पावसाने राज्यात दाणादाण उडविली

**विदर्भ प्रजासत्ताक दि.३०अमरावती**

कोकण वगळता मध्य महाराष्ट्र व मराठवाड्यात मोठ्या पावसाची शक्यता नसून पुढील दोन दिवसात हलका ते मध्यम स्वरुपाचा पाऊस पडेल. त्यानंतर पावसाचा जोर आणखी कमी होत जाईल, असा अंदाज भारतीय हवामान विभागाने वर्तविला आहे. सध्या झालेला पाऊस अनपेक्षित असून, पावसाचा जोर कमी झाल्यास व उघडीप मिळाल्यास पेरणीयोग्य वापसा स्थिती तयार होणार आहे. त्यानंतरच शेतकऱ्यांनी पेरणी करावी, असा सल्ला कृषी विभागाने दिला आहे. गेला आठवडाभर पावसाने राज्यात दाणादाण उडवून दिली. हवामान विभागाने हा पाऊस मान्सूनचा असल्याचे म्हटले तर तज्ज्ञांनी पूर्वमोसमी असल्याचे सांगितले. त्यानंतर आता पुढील पाच दिवसात पावसाची तीव्रता कमी होण्याचा अंदाज हवामान विभागाने वर्तविली आहे.

भारतीय हवामानशास्त्र विभागाचे शास्त्रज्ञ डॉ. एस. डी. सानप म्हणाले, मान्सूनच्या वाऱ्यांमधील जोर कमी झाला आहे. मध्य महाराष्ट्र व मराठवाड्यावरील कमी दाबाचे क्षेत्र विरल्याने अरबी समुद्रातील कमी दाबाचा पट्टाही कमी होईल.राज्यात पुढील चार ते पाच दिवसांमध्ये कोकणवगळता मध्य महाराष्ट्र व मराठवाड्यात मोठ्या पावसाची शक्यता नाही. कोकणात दोन दिवस जोरदार पाऊस पडण्याची शक्यता आहे. त्यानंतर तेथेही पाऊस कमी होईल.



राज्याच्या अनेक भागात मोठ्या प्रमाणात पाऊस पडलेला असताना लगेच पेरण्या कराव्यात की नाहीत याबाबत शेतकऱ्यांमध्ये संभ्रम असताना आता कृषी खात्याने लगेच पेरण्या न करण्याचा सल्ला दिला आहे.

कृषी विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी 'लोकमत'ला सांगितले की, पेरणीसाठी जमिनीमध्ये जितकी ओल असणे आवश्यक असते त्यापेक्षा कितीतरी जास्त ओल अतिवृष्टीमुळे निर्माण झाली आहे. त्यामुळे पेरणी करतानादेखील अनेक अडचणी येतील. मातीचे लगेच गोळे होत असल्याने बीजरोपण योग्य पद्धतीने होणार नाही.

आपल्या परिसरातील बातम्या, लेख, यशोगाधा, जाहिरात तुम्ही आमच्या मेल वर पाठवू शकता prajasattaknews.24gmail.com, arunjoshi.ucn@gmail.com या मेल वर पाठवा आमचा अंक तुम्हाला अगदी मोफत मिळवायचा असेल तर आम्हाला मेल करा तुमचा व्हाट्सअप नंबर
सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक RNI NO-M-HM-R 2023/84526-प्रिंट / **PDF** / वेब - पोर्टल /ई - पेपर

# विदर्भ प्रजासत्ताक

शुक्रवार दि. ३० मे २०२५

शहर/ग्रामिण


# अमरावतीत वृत्त पत्र विक्रेत्यांच्या संपाचा आज दुसरा दिवस

## गुरुवार पासून शहरात वृत्त पत्र वितरण ठप्प




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०अमरावती –** हेडिंग मोठे घेणेअमरावती वृत्तपत्र विक्रेता संघटनेने वृत्तपत्र विक्रीमुल्यावरील कमिशन चाखजूर खाचे व वृत्तपत्रासोबतची पुरवणी ही वृत्तवासोबत आत टाकून द्यावी, या दोन प्रमुख

मागण्यांसाठी गुरुवारपासून (ता.२९) तीन दिवसीय संप पुकारला आहे. या संपामुळे अमरावती शहरातील वृत्तपत्र वितरण ठप्प झाले आहे. अमरावती वृत्तपत्र विक्रेता संघटनेच्या पदाधिकारी व सदस्यांनी गुरुवारी सकाळी अमरावतीमध्यवर्ती बसस्थानक येथे एकत्र येऊन प्रादेशिक आणि स्थानिक असे दोन्ही वर्तमानपत्र वितरणासाठी घेण्यास संप असल्याचे कारण पुढे करत नकार दिला. त्यामुळे शहरात वृत्तपत्र वितरणावर त्याचा मोठा परिणाम झाला.दोन मागण्या घेऊन वृत्तपत्र विक्रेत्यांनी हे आंदोलन पुकारले आहे. संबंधित वृत्तपत्र वितरण ठप्प झाल्यामुळे वाचकांचा रोषाला आपल्याला सामोरे जावे लागणार नाही का, असे वृत्तपत्र विक्रेत्यांना विचारले असता वाचकांचा पूर्ण पाठिंबा आम्हाला असल्याचे त्यांनी सांगितले. वृत्तपत्राची किती किंमत ठेवावी हा वृत्तपत्र व्यवस्थापनाचा विषय आहे. आमचा संबंध केवळ कमिशन पुरता मर्यादित आहे. या आंदोलनाची पूर्व सूचना सर्व वृत्तपत्र मालक, व्यवस्थापनांना देण्यात आली होती. तथापि आम्ही संबंधित मागण्या पूर्ण करू शकत नाही, असे स्पष्ट उत्तर नागपूर येथील विदर्भ डेली न्यूजपेपर असोसिएशनने (व्हिडीएनए) दिलेले आहे. वृत्तपत्राची किंमत हा आमची समस्या नाहीच, आम्हाला केवळ प्रत्येक अंकावर दोन रुपये दहा पैसे कमिशन मिळावे, जर हे कमिशन देण्याची वृत्तपत्राचे मालक आणि व्यवस्थापनाची तयारी असेल तर हा संप तीन दिवसाचा असला तरी तो त्यापूर्वीही मागे घेतला जाऊ शकतो. फक्त त्यासाठी आम्हाला लेखी द्यावे, असे संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले. वृत्तपत्र विक्रेता संघटनेची मागणी ही चुकीची नाही. रास्त मागणी आहे. या मागणीचा वर्तमानपत्र व्यवस्थापनांनी विचार करावा. २००९ पासून वर्तमानपत्रावर मिळणारे कमिशन वाढलेले नाही हे विशेष.



गेल्या पंधरा वर्षापासून वृत्तपत्राच्या विक्रीमुल्यावर मिळणारे कमिशन वाढविण्यात आलेले नाही. संबंधित कमिशन हे प्रति पेपर दोन रुपये दहा पैसे मिळावे तसेच वृत्त वृत्तपत्रासोबत देण्यात वेणारी पुरवणी हीसुद्धा वृत्तपत्रात टाकलेली असावी, या दोन मागण्यांसाठी संप पुकारलेला आहे.

– **सुमित इंगोले,** अध्यक्ष, अमरावती वृत्तपत्र विक्रेता संघटना, अमरावती.

# विम्याचा लाभ, वैद्यकीय सुविधेसह टोलमाफी

## वारकऱ्यांसाठी राज्य सरकारने घेतले निर्णय



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०मुंबई–** विम्याचा लाभ, वैद्यकीय सुविधेसह टोलमाआषाढी वारीनिमित्त वारीत सहभागी होणाऱ्या वारकऱ्यांना संरक्षण देण्यासाठी त्यांचा समूह विमा काढण्यात येईल तसेच त्यांना दरवर्षीप्रमाणे यावर्षीही वैद्यकीय सेवा पुरवण्यात येतील. दरवर्षीप्रमाणे यंदाही वारकरी वाहनांना टोलमध्ये सवलत दिली जाईल अशी माहिती उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली आहे. आषाढी वारीनिमित्त केलेल्या उपाययोजना आणि वारकऱ्यांना भेडसावणाऱ्या विविध समस्यांचा आढावा घेण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली बुधवारी सह्याद्री अतिथीगृहात विशेष बैठक पार पडली होती.

या बैठकीत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले की, नुकत्याच झालेल्या मुसळधार पावसामुळे वारी मार्ग कुठेही खराब झाला असल्यास मुरूम, खडी आणि डांबरीकरण करून त्याची तातडीने डागडुजी करावी. वारकऱ्यांना मुबलक पाणी, विजेची जोडणी, पालखी तळावर वॉटरप्रूफ तंबू उपलब्ध करून घ्यावे तसेच वारीसाठी जाणाऱ्या गाड्यांना दरवर्षीप्रमाणे टोल मध्ये सवलत दिली जाईल असेही त्यांनी सांगितले.

**आरोग्य तपासणी–** मागील वर्षीसारखे याहीवर्षी आषाढी वारीनिमित्त राज्याच्या आरोग्य विभागाकडून भव्य आरोग्य शिबिरे आयोजित केली जातील. वारकऱ्यांसाठी कार्डीएक रुग्णवाहिकेची सोय उपलब्ध करून दिली जाईल. पंढरपुरात तात्पुरती आयसीयू सुविधा उपलब्ध करून दिली जाईल. या सर्व सोयी उपलब्ध करून देण्यासाठी आरोग्य मंत्री प्रकाश अबिटकर यांनी स्वतः पंढरपूरला जाऊन आढावा घ्यावा असे निर्देश शिंदे यांनी दिलेत. तसेच प्रत्येक जिल्ह्यातून निघणाऱ्या मोठ्या दिड्यांना वारीच्या काळात पूर्णवेळ सुसज्ज रुग्णवाहिका उपलब्ध करून द्यावी असेही उपमुख्यमंत्र्यांनी सांगितले.

**नोडल अधिकारी नेमणार–** यासोबतच गतवर्षी वारीदरम्यान झालेल्या अपघातात मृत्युमुखी पडलेल्या वारकऱ्यांना शासनाद्वारे मदत केली जाईल. पोलिसांशी व्यवस्थित समन्वय व्हावा यासाठी नोडल ऑफिसर नेमण्यात येईल. वारकऱ्यांचे भोजन आणि इतर प्रथा परंपरा वेळच्या वेळी पार पाडाव्यात यासाठी वारी कुठे जास्त वेळ खोळंबणार नाही यासाठी प्रयत्न केला जाईल. यंदाची वारीही स्वच्छ वारी, निर्मल वारी हरित वारी म्हणून आपल्याला पार पाडायची असल्याने त्यासाठी लागेल ते सर्व सहकार्य शासनाकडून केले जाईल असेही उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले.

# उद्यापासून दोन दिवस विदर्भ करंडक एकांकिका स्पर्धा

## दोन दिवसात बघायला मिळणार तब्बल १८ नाटके



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३० अमरावती–** 'अद्वैत' या विशाल तराळ यांच्या संस्थेतर्फे आयोजित केली जाणारी विदर्भ करंडक खुली एकांकिका स्पर्धा शनिवार, ३१ मे रोजी सकाळी ९ वाजता बडनेरा रोड स्थित सिपना अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या अरविंद उर्फ भाऊ लिमये सभागृहात सुरू होणार आहे. नाट्य तपस्वी डॉ. संध्या घडेकर आणि नाट्यधर्मी शुभदा ओक यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ आयोजित स्पर्धेचे हे दुसरे वर्ष आहे. या वर्षी स्पर्धेच्या माध्यमातून रसिकांना तब्बल १८ एकांकिका पाहण्याची संधी प्राप्त झाली आहे. स्पर्धेचे उद्घाटन सकाळी ९ वाजता अद्वैतच्या 'तेरा मेरा सपना–टीव्ही हो अपना' या नाटकाने केले जाईल. त्यानंतर तासाभराने स्पर्धेचा अनौपचारिक उद्घाटन सोहळा आयोजित केला आहे. या स्पर्धेच्या माध्यमातून दर्जेदार लेखक, दिग्दर्शक, संगीतकार, प्रकाश योजनाकार, रंगभूषाकार, अभिनेत्री, अभिनेता, बालकलावंत, विनोदी कलावंत यांच्यासह सांघिक असे प्रथम, द्वितीय, तृतीय व लक्षवेधी एकांकिका मिळून ३२ पारितोषिके दिली जाणार आहेत.

उद्घाटन सोहळ्यानंतर दुपारी १२ वाजता पुन्हा एकांकिका स्पर्धा सुरू होईल. या दरम्यान अंटायल्ड, उत्तरायण, एक्स, नजरेचा खेळ, एन्काउंटर, झूम इन–झूम आउट, रानभूल, लॉटरी, द वल्चर अँड द लिटल गर्ल, वि. प्र. अशी नाटके सादर होतील. पहिल्या दिवशीची शेवटची एकांकिका रात्री साडे नऊला संपेल, असे नियोजन आहे. त्यानंतर दुसऱ्या दिवशी रविवारी सकाळी ९ वाजता तृष्णा रोग या एकांकिकेने स्पर्धेचा प्रारंभ होईल. नंतर रिचर्स अँड ॲनालिसिस विंग, अ बुबी ट्रॅप, यतो धर्मस्ततो जयः, चार्ली, संगीत शक्ती आदी नाटके सादर केली जाणार आहेत.

डॉ. देशमुख, उसेंडी यांना पुरस्कार उद्घाटन सोहळ्यादरम्यान अमरावतीच्या मातीतील नाट्यकला समृद्ध करणाऱ्या नाट्य तपस्वी रंगकर्मीला अद्वैत नाट्य जीवनगौरव पुरस्कार दिला जाणार आहे. हा पुरस्कार डॉ. श्याम देशमुख यांना घोषित झाला असून, अद्वैत झाडीपट्टी नाट्य गौरव पुरस्कार गडचिरोली येथील मासरघाटा गावातील रंगकर्मी लालचंद उसेंडी उर्फ पी. लालचंद यांना जाहीर झाला आहे. या दोन्ही पुरस्कारांचे मान्यवरांच्या हस्ते वितरण केले जाणार आहे.

# गुरुवारच्या सायंकाळी शहरात १५ मिनिटात १० मिमी कोसळला पाऊस

## मान्सून लांबला पण अवकाळीचा कहर सुरूच



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०अमरावती–** शहरात दररोज अवकाळी पाऊस हजेरी लावत आहे. या पावसाने शहरासह ग्रामीण भागातील जनजीवन विस्कळीत झाले आहे. दरम्यान गुरुवारी सकाळपासून शहरात वातावरण ढगाळ परंतु ऊन होते. त्यामुळे आज पाऊस खंड देणार असे वाटत असतानाच सायंकाळी ७ वाजताच्या सुमारास सोसाट्याच्या वाऱ्यासह पावसाने शहरातील अनेक भागात हजेरी लावली. अवघ्या १५ मिनिटांत १० मिमी पावसाची नोंद येथील श्री शिवाजी कृषी महाविद्यालयात झाली आहे.

मागील आठ ते दहा दिवसांपासून दररोज येणाऱ्या या पावसामुळे ग्रामीण भागातील शेती मशागतीची सर्व कामे खोळंबली आहे. मान्सून मुंबईत दाखल झाला आहे, त्यामुळे आगामी आठवड्यात मान्सून दाखल होईल, अशावेळी मशागत करायची कशी, असा प्रश्न शेतकऱ्यांसमोर उभा ठाकला आहे. अनेक शेतात उन्हाळी पीक उभे आहे, मात्र पावसामुळे ती पिके काढणीचे कामही रखडले आहे. त्यामध्ये तीळ, भुईमूग, ज्वारी, कांदा, भाजीपाला व इतर पिकांचा समावेश आहे.

दरम्यान मान्सून आठवडाभर विदर्भात दाखल होणार नाही. शिवाय अवकाळी पावसाचाही जोर आता कमी होणार असल्याचा अंदाज हवामान अभ्यासक प्रा. अनिल बंड यांनी वर्तवला आहे. गुरुवारी सायंकाळी पावसामुळे जनजीवन विस्कळीत झाले होते.

अनेक भागात वीज पुरवठा वारंवार खंडित शहरात गुरुवारी सायंकाळी वादळी वाऱ्यासह पावसाने हजेरी लावली. १५रा मिनिटे पाऊस पडला. मात्र अगोदर वादळी वारा सुटला होता. त्यामुळे शहरातील अनेक भागात वीज पुरवठा खंडित झाला होता.

# दर्यापूरमध्ये धावत्या बसचा जॉइंट रॉड तुटला

## दर्यापूर आगाराचा भोंगळ कारभार पुन्हा एकदा चव्हाट्यावर





**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०दर्यापूर–** शिवशाही बसेस बंद पडण्याची घटना ताजीच असताना येथील बस आगाराच्या गलथान कारभाराचा दुसरा नमुना समोर आला आहे. रस्त्यावर धावताना बसचा जॉइंट रॉड तुटला. त्यामुळे विद्यार्थी व अन्य प्रवाशांना गाडीला धक्का देत पुढे न्यावे लागले.

या घटनेमुळे या आगाराचा भोंगळ कारभार पुन्हा एकदा चव्हाट्यावर आला आहे. दर्यापूर आगारातील कित्येक बसेस या भंगार अवस्थेत असल्यामुळे प्रवाशांना याचा नाहक त्रास सहन करावा लागत आहे. ग्रामीण भागात दर्यापूर बस स्थानकातून ज्या बसेस ये–जा करतात. त्यातील बहुतांश बसेस रस्त्याच्या मध्यभागीच बंद पडत आहेत. तर दुसरीकडे गुरुवारी दुपारी साडेचार वाजता दर्यापूर आगाराची क्रमांक एमएच ४० एन ९९४५ ही बस आगारातून बसस्थानकात जात असताना काही अंतरावरच बंद पडली. या बसचा जॉइंट रॉड तुटला. भंगार बसेस तातडीने बंद करा आगार ते बसस्थानका दरम्यानचा रस्ता वर्दळीचा असल्याने वाहतूक विस्कळीत झाली होती. सुदैवाने बसमध्ये एकही प्रवासी नसल्याने पुढील अनर्थ टळला. मुख्य रस्त्यावरून नागरिकांनी बस लोटत बसस्थानकात नेली. परंतु अशा भंगार बसेसमुळे भविष्यात मोठी जीवितहानी होऊ शकते, ही बाब प्रशासनाने लक्षात घेणे गरजेचे आहे. त्यामुळे भंगार बसेस तातडीने बंद करून नवीन बसेस दर्यापूर आगाराला द्याव्यात, अशी मागणी प्रवाशांनी केली आहे.

# बडनेरा पोलिस स्टेशनमध्ये कायदेविषयक जागरूकता कार्यक्रम




**विदर्भ प्रजासत्ताक दि.३०अमरावती–** बडनेरा पोलिस स्टेशन आणि जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या वतीने सोमवार, दि. २६ मे २०२५ रोजी एलजीबीटीक्यूआयए समुदाय सदस्यांच्या संबंधात विशेष कायदेविषयक जागरूकता कार्यक्रम आयोजित करण्यात आला.वरिष्ठ पोलिस निरीक्षक प्रफुल गीते अध्यक्षस्थानी होते. यावेळी एपीआय सोनाली मेश्राम यांच्यासह कर्मचारी उपस्थित होते. यावेळी उपमुख्य अधिवक्ता ॲड. अमित सहारकर यांनी तृतीयपंथीसाठी असणारे कायदे आणि तरतुदीविषयी मार्गदर्शन केले. श्री. गीते यांनी प्रास्ताविक केले. विधी स्वयंसेवक निकिता चौहान यांनी सूत्रसंचालन केले, विधी स्वयंसेवक साक्षी महल्ले यांनी आभार मानले.

# पीपल्स कला मंचच्या चिमुकल्यांनी केले पक्षी व जंगल निरीक्षण

## गट साधन केंद्र अमरावती व पीपल्स कलामंच यांच्या संयुक्त विद्यमाने दहा दिवस नाट्य अभिनय व व्यक्तिमत्व विकास शिबिर चे आयोजन....



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०अमरावती–** पीपल्स कला मंच व गटसाधन केंद्र गर्ल्स हायस्कूल अमरावती यांच्या संयुक्त विद्यमाने गेल्या दहा दिवसापासून नाट्य अभिनय व्यक्तिमत्व विकास शिबिर शिबिर गर्ल्स हायस्कूल अमरावती येथे सुरू असून या शिबिरातील चिमुकल्यांनी जंगलाचा व पशु पक्षांचा अभ्यास करण्यासाठी एक दिवस जंगल भ्रमण केले व पशुपक्षी जंगलाच निरीक्षण करून अभ्यास केला....

अमरावती लगतच्या छत्री तलाव परिसरातील जंगलामध्ये विद्यार्थ्यांनी जंगल भ्रमण केले यामध्ये विविध पक्षांची ओळख जंगलातील विविध झाडांची ओळख यावेळेस विद्यार्थ्यांना करून देण्यात आली यावेळी वाईल्ड लाईफ अवेरनेस रिसर्च अँड रेस्क्यू सोसायटीचे अध्यक्ष निलेश कंचनपुरे, पक्षी मित्र प्रशांत निकम,मंगेश उल्हे,यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले....

गेल्या दहा दिवसापासून हे शिबिर सुरू असून यामध्ये नाटक, गीत गायन, डान्स, योगा, झुंबा,स्टेज डेरिंग, भाषण कौशल्य, विविध विषयावरील तज्ञांनी यावेळी चिमुकल्यांना मार्गदर्शन केले या दहा दिवसात मोबाईल पासून हे चिमुकले लांब राहून त्यांनी त्यांच्या अंगात असलेल्या सुप्त गुणांना वाव दिला...यावेळी गेली दहा दिवस अमरावती गट साधन केंद्राचे विषय तज्ञ, पीपल्स कला मंचाचे अध्यक्ष विवेक राऊत संस्थापक अध्यक्ष सिद्धार्थ भोजने पिपस कला मंचाचे संचालक मनीष हटवार, गर्ल्स हायस्कूल चे मुख्याध्याप क तथा गटशिक्षणाधिकारी धनंजय वानखडे गटसाधन केंद्राचे टसमन्वयक मंगेश उल्हे, वैशाली वऱ्हाडे,अमर घटारे, सुधांशू भोजने, सुवर्णा उल्हे,रिया पंजावाणी, संतोष सुरकर, पियुष पाटील,पल्लवी पात्रीकर, निलेश मोहकर, श्रावणी विजय दवाळे, उज्वल पडेकर,दीपाली हटवार यांनी दहा दिवस शिव्यातील शिबिर शिबिरार्थ्यांना मार्गदर्शन केले.

# ईदनिमित्त पोलीस आयुक्तांनी घेतली शांतता समितीची बैठक

## पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांकडून तपासणी करून कुर्बानी देण्याचे आवाहन




**विदर्भ प्रजासत्ताक**

**अमरावती–** आगामी ईद सण शांततेत पार पहावा यासाठी पोलीस आयुक्त कार्यालयात आयुक्त अरविंद चावरीया यांच्या अध्यक्षतेखाली शांतता समितीची बैठक आयोजित करण्यात आली होती. बकरी इद दरम्यान पशु वैद्यकीय अधिका-यांकडून जनावरांची तपासणी करूनच कुर्बानीसाठी वापर करावा, असे आवाहन पोलीस आयुक्त चावरीया यांनी केले आहे. याबैठकीला आ. रवी राणा यांनीही उपस्थिती दर्शविली होती.

पोलीस आयुक्त कार्यालयात आयुक्त अरविंद चावरीया यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत मुस्लिम समाजाचे मौलवी, मशिदचे ट्रस्टी, ईदगाह दृस्टी, कुरेशी समाजाचे सदस्य, हिंदू संघटनेचे प्रमुख पुढारी, प्रतिष्ठित नागरिक तथा शांतता समितीचे सदस्य उपस्थित होते. यासह महापालिका आयुक्त, पशु वैद्यकीय विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग, विद्युत विभाग व पाणीपुरवठा विभागाच्या अधिकाऱ्यासह पोलीस आयुक्तालयातील अधिकारी उपस्थित होते. बकरी ईद आनंदाने साजरी करण्यासाठी आवश्यक त्या उपाययोजना करण्याच्या मूबना पोलीस आयुक्त

चावरीया यांनी अधिकाऱ्यांना दिल्या. तसेच महापालिका आयुक्त सचिन कलंत्री यांनी साफसफाई संदर्भात आपल्या अधिनस्त अधिकाऱ्यांना सूचना दिल्या. यासह नियमित पाणीपुरवठा व वीजपुरवठा करण्याचे सांगण्यात आले. पशु संवर्धन विभागाचे सहायक आयुक्तांनी पशु वैद्यकीय अधिका-यांकडूनच जनावरांची

तपासणी करून कुर्बानीसाठी वापर करण्याचे आवाहन केले. या सण-उत्सवादरम्यान हिंदू-मुस्लिम बांधवांमध्ये शांतता अबाधित रहावी, यासाठी सहकार्य करावे. तसेच अफवांवर विश्वास ठेऊ नये, असेही आवाहन पोलीस आयुक्त अरविंद चावरिया यांनी बैठकीत केले.यावेळी नवनियुक्त पोलीस आयुक्त यांचा शाल,बुका देत आ.राणा यांनी स्वागत ही केले.

# एपीएमसीच्या फळ बाजारात दुर्गंधी अन् चिखलात उभे राहून माल विक्री

## सभापती महोदय लक्ष देतील का?



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०अमरावती**

पहाटे साडेपाच वाजतापासून बाजारात माणसांची वर्दळ सुरू झाली. यामध्ये कोणी किरकोळ विक्रेता, कोणी ग्राहक तर कोणी खरेदीदार, शेतकरी असतात. आदल्या दिवशी रात्री बऱ्यापैकी पाऊस कोसळला होता. त्यामुळे बाजार समितीच्या आवारात पाय टाकताच पाय अन् नाकानेच सांगितले की, आपण एपीएमसीच्या जुना कॉटन मार्केटमध्ये आलो. फळ बाजारात तर मरणाची दुर्गंधी होती.

पाय अख्खा चिखलात बुडणार इतका चिखल, मोठमोठ्या वाहनांची गर्दी, लिलावासाठी सुरू असलेला आवाज. त्यानंतर लिलावही झाला आणि विविध फळ व मालांची विक्री झाली. मात्र या परिसरात असलेला किळसवाणा चिखल, प्रचंड अस्वच्छता अन् मरणाची दुर्गंधी पाहता लाखो नागरिक याच ठिकाणाहून गेलेले फळ व इतर माल खातात, यावर विश्वास बसत नाही पण हीच अमरावती बाजार समितीच्या फळ बाजारातील वास्तव आहे.

शहरातील जुना कॉटन मार्केट परिसरात बाजार समितीच्या नियंत्रणात असलेल्या फळ बाजारात असलेली दुर्गंधी, अस्वच्छता आणि चिखल पाहून अमरावतीकर दररोज अशा ठिकाणाहून आलेली फळे

भाजीपाला विकला जातो. हा माल खरेदी करण्याशिवाय पर्याय नाही. कारण हा एकच मुख्य बाजार आहे. या ठिकाणी असलेली दुर्गंधी व अस्वच्छता कधी कमी होईल, हा प्रश्न आहे. थेट लाखो नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न असलेल्या या फळ व भाजी बाजारातील परिस्थिती लोकप्रतिनिधी,बाजार समिती सभापती कधीतरी पाहतील का, हा प्रश्न समोर आला आहे.

# अंजनगावात कुल्फीत आढळली तार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०अंजनगाव सुर्जी**

शहरातील एका दूध डेअरीमध्ये विकल्या गेलेल्या कुल्फीमध्ये चक्क तार आढळून आली. बासंदर्भात संबंधित ग्राहकाने डेअरी व्यवस्थापकाकडे तक्रार केली. मात्र, डेअरी व्यवस्थापकाने त्याची दखल न घेता उलट प्रारकालाच उद्धट वागणूक दिली. अखेर त्या आहकाने पोतिमान तक्रार दिली. या प्रकरणी पोलिसांनी परस्परविरोधी तक्रारी दाखल केल्या आहेत. अन्न व औषधी प्रशासन यावर काय कारवाई करते, वाकडे शहरवासियांचे लक्ष लागले आहे.

तुरखेड येथील अंकित कोल्हे हे त्यांची बहिण व भाच्यासह २५ मे रोजी शहरातील गौमाता दूध डेअरीमध्ये आले. तेथून त्यांनी काही कुल्फी विकत घेतल्या. त्यांचा भाचा कुल्फी खात असताना त्यामध्ये तार आढळून आली. सुदैवानी ती तार कुल्फीसोबत त्याच्या पोटात गेली नाही. त्यामुळे अनर्थ टळला. याबाबत त्यांनी लगेच दूध डेअरीमध्ये जाऊन विचारणा केली. डेअरी




व्यवस्थापकाने अंकित कोल्हे यांच्या बहिणीची बाजू

### ग्राहकाची पोलिसात धाव, अन्न व औषधी प्रशासन लक्ष देणार का?

समजून न घेता किंवा ग्राहकाचे समाधान करण्याऐवजी त्यांच्यासोबत वाद घातला. अखेरिस अंकित कोल्हे यांनी पोलीस ठाण्यात पोहोचून रितसर तक्रार दाखल केली. आता अन्न व औषध प्रशासन काय कारवाई करणार याकडे ग्राहकांचे लक्ष लागले आहे.

# अवैध व्यवसायाविरुद्ध ऑपरेशन प्रहार

## जिल्ह्यात कायद्याचे राज्य आणणार- एसपी अर्चित चांडक

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०अकोला**

पोलिस अधीक्षक म्हणून पदभार स्वीकारल्यानंतर नवनियुक्त पोलिस अधीक्षक अर्चित चांडक हे पहिल्या दिवसापासूनच अॅक्शन मोडवर आले आहेत. त्यांनी 'ऑपरेशन प्रहार'ची घोषणा केली. अकोला जिल्हा अवैध धंदे मुक्त व सुरक्षित व्हावा, ही यामागची भूमिका असल्याचे अर्चित चांडक यांनी म्हटले आहे. पोलिस अधीक्षकांनी दावा केला आहे की, या मोहिमेमुळे कायद्याचा धाक निर्माण होईल. जिल्हा अवैध धंदे मुक्त व सुरक्षित होईल. इतकेच नव्हे तर सर्वसामान्य नागरिकांनी अवैध धंद्याविरोधात आवाज उठवावा तसेच पोलिस दलाशी सहकार्य करावे. आपल्या परिसरात अशा प्रकारचे गैरव्यवहार दिसल्यास तत्काळ पोलिस नियंत्रण कक्षाची संपर्क साधावा. पोलिस विभागाच्या वतीने नागरिकांचा सक्रिय सहभाग आणि सुरक्षित सहकार्य या मोहिमेस अधिक बळ देईल.अकोला जिल्ह्यातील जनतेस एक सुरक्षित, शांततामय आणि कायद्याचे राज्य निर्माण करण्यासाठी 'ऑपरेशन प्रहार' हा एक महत्वाचा टप्पा ठरणार आहे, असेही पोलिस अधीक्षक



चांडक म्हणाले. जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्थे सह अवैध धंद्यावर अंकुश लावण्यासाठी ऑपरेशन प्रहार या मोहिमेची घोषणा केली. अवैधतेचा अंत, प्रहाराचा प्रारंभ या ब्रीद वाक्यातून अवैध धंद्यावर कठोर कारवाईचा प्रारंभ केला आहे. पोलिस अधीक्षक अर्चित चांडक यांनी अवैध व्यवसायांवर लक्ष केंद्रित करुन कठोर पावले उचलण्यास सुरुवात केली. गोवंश तस्करी, बेकायदा दारू उत्पादन, विक्री, जुगार अड्डे, मटका आणि अन्य प्रकारचे अवैध धंदे यावर कडक कारवाई करण्याचे निर्देश सर्व ठाणेदार, उपविभागीय पोलिस अधिकारी यांना दिले आहेत. नागरिकांनी पोलिसांना सहकार्य करावे. अवैध धंद्याविरुद्ध आवाज उठवावा , पोलिसांना माहिती द्यावी, कारवाई केली जाईल, अवैध धंदे बंद केले जातील, असे आवाहन पोलिस अधीक्षक अर्चित चांडक यांनी केले. मात्र, अवैध धंद्याविरुद्ध आवाज उठवण्यासाठी नागरिक घाबरतात. कारवाईनंतर पोलिसांना माहिती कुणी दिली, हे माफियांना माहित होते, असा इतिहास आहे. यंत्रणेतील काही जण हे करत असतात. त्यासाठी तक्रारकर्त्यांचे नाव गोपनीय राहील, याविषयी यंत्रणा कशी कार्यान्वित करतील. यावरच ऑपरेशन प्रहारचे यश अवलंबून असेल एवढे मात्र निश्चित.

# ४८ वर्षीय महिलेचा मृतदेह पाण्याच्या ड्रममध्ये

## मृत्यू संशयास्पद; पोलीस पीएम अहवालानंतर गुन्हा नोंदविणार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३० अमरावती**

नागपुरी गेट पोलिस ठाण्याच्या हद्दीतील जाकीर कॉलनीमध्ये राहणाऱ्या एका ४८ वर्षीय महिलेचा मृतदेह तिच्याच घरातील पाण्याच्या ड्रममध्ये आढळला आहे. या महिलेच्या गळ्यावर तसेच हातावर ब्लेडचे वारही आहे. त्यामुळे या प्रकरणात घातपाताची शक्यता वर्तवण्यात आली आहे. सविस्तर शवविच्छेदन अहवालाअंती या प्रकरणात पोलिस गुन्हा दाखल करण्याबाबत निर्णय घेणार आहेत. शाहीस्ताबी आसिफ खान (४८, जाकीर कॉलनी, अमरावती) असे मृतक महिलेचे नाव आहे. शाहीस्ताबी यांच्या घरात पती, दोन मुले असे चौघे जण राहतात.



शाहीस्ताबी यांना २२ वर्षे वयाची मुलगी व २० वर्षे वयाचा मुलगा आहे. मात्र हे दोन्ही अपत्य 'विशेष' मुले आहेत. त्या दोन्ही मुलांचे संगोपन शाहीस्ताबी करत होत्या. दरम्यान बुधवारी रात्री हे चौघेही घरात झोपले होते. मात्र पहाटे साडेतीन वाजताच्या सुमारास आसिफ खान यांना शाहीस्ताबी त्यांच्या जागेवर झोपलेल्या दिसल्या नाही. म्हणून त्यांनी घरातच सर्वत्र पत्नीचा शोध घेतला. त्याचदरम्यान पाण्याच्या ड्रममध्ये शाहीस्ताबी यांचा मृतदेह दिसला. या महिलेच्या गळ्यावर आणि हातावर ब्लेडचे वारसुद्धा होता. त्यामुळे ड्रममध्ये रक्त दिसले. या घटनेची माहिती आसिफ खान यांनी तत्काळ नागपुरी गेट पोलिसांना दिली. पोलिसांनी तातडीने घटनास्थळ गाठले. मृतदेह ताब्यात घेऊन शवविच्छेदनासाठी पाठवला आहे. शवविच्छेदन अहवालाअंती मृत्यूचे नेमके कारण काय, मृत्यू नेमका कधी झाला, त्यानंतर गुन्हा दाखल करण्याबाबत नागपुरी गेट पोलिस निर्णय घेतील.





> महिलेचा पाण्याच्या ड्रममध्ये मृतदेह आढळला आहे. मानेवर व हातावर ब्लेडचे वार आहेत. मात्र ठोस निष्कर्षाप्रत आम्ही पोहचलो नाहीत. त्यामुळेच डॉक्टरांकडून सविस्तर पीएम रिपोर्टची प्रतीक्षा आहे. हा रिपोर्ट आल्यानंतर त्या आधारे गुन्हा दाखल करण्याबाबत निर्णय घेणार. तूर्तास आकस्मिक मृत्यूची नोंद केली आहे. **हनुमंत उरलागोंडावर**, ठाणेदार, नागपुरी गेट, पोलिस ठाणे.

# विदर्भाचे सुपुत्र अतुल चांदूरकर सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.३०नागपूर–** नागपूर : विदर्भाचे सुपुत्र व मुंबई उच्च न्यायालयाचे वरिष्ठ न्यायमूर्ती अतुल चांदूरकर यांची गुरुवारी सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायमूर्तीपदी नियुक्ती करण्यात आली. सर्वोच्च न्यायालयाच्या कॉलेजियमने यासंदर्भात गेल्या सोमवारी केलेली शिफारस केंद्र सरकारद्वारे मंजूर करण्यात आली.

न्या. चांदूरकर यांची दि. २१ जून २०१३ रोजी मुंबई उच्च न्यायालयामध्ये अतिरिक्त न्यायमूर्तीपदी नियुक्ती करण्यात आली होती. त्यानंतर २ मार्च २०१६ रोजी त्यांना सेवेत कायम करण्यात आले. त्यांनी पुणे येथील सेंट व्हिन्सेंट हायस्कूलमधून शालेय शिक्षण व नेस वाडिया महाविद्यालयातून पदवी शिक्षण पूर्ण केले तर, आयएलएस विधी महाविद्यालयातून एलएल.बी. पदवी प्राप्त केली आहे. त्यांनी दि. २१ जुलै १९८८ पासून मुंबई येथील वरिष्ठ ड. बी. एन. नाईक यांच्या मार्गदर्शनाखाली वकिली व्यवसायाला सुरुवात केली. पुढे ते १९९२ मध्ये नागपुरात स्थायिक झाले. त्यांनी येथील विविध न्यायालयांमध्ये वकिली करताना संवैधानिक, दिवाणी, फौजदारी, प्रशासकीय असे विविध प्रकारचे विषय प्रभावीपणे हाताळले. यापूर्वी विदर्भातून न्या. मोहम्मद हिदायतुल्ला, न्या. जनार्दन




मुधोळकर, न्या. ए. पी. सेन, न्या. विकास सिरपूरकर, न्या. शरद बोबडे व न्या. भूषण गवई यांची सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायमूर्ती पदी नियुक्ती झाली आहे. यापैकी न्या. हिदायतुल्ला व न्या. बोबडे यांनी सरन्यायाधीश पद भूषविले व सध्या न्या. गवई सरन्यायाधीशपदी कार्यरत आहेत.

# अकोला आगार-२ चे समितीकडून मूल्यमापन: हिंदुहृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे स्वच्छ, सुंदर बसस्थानक अभियान तपासणी

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.३०अकोला–**हिंदू हृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे स्वच्छ व सुंदर व स्थानक अभियान अंतर्गत मूल्यमापन समितीने गुरुवारी २९ मे रोजी अकोला विभाग नियंत्रक कार्यालय अंतर्गत येणाऱ्या आगार क्र. २ येथे बसस्थानक व परिसर स्वच्छता व सुंदरीकरण, चालक-वाहक विश्रांती गृह, प्रवाश्यांसाठी असलेले सुलभ शौचालय, स्तनदा मातांसाठी हिरकणी कक्ष, प्रवाश्यांना दिल्या जाणाऱ्या सुखसोयी आदी विषयांची पाहणी करून मूल्यमापन केले.

स्व. बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंतीनिमित्त पुढील वर्षभर एसटीच्या राज्यभरातील सर्व बसस्थानकांवर हिंदुहृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे स्वच्छ, सुंदर बसस्थानक अभियान राबवण्यात येत आहे. यासाठी ३ कोटी रुपयांची बक्षिसे या अभियानांतर्गत देण्यात येणार असून राज्यात 'अ' वर्ग दर्जाप्राप्त पहिल्या येणाऱ्या बसस्थानकाला १ कोटीचे बक्षीस जाहीर केले आहे. यानिमित्ताने बसस्थानकावर शालेय विद्यार्थी, सामाजिक संस्था व एसटी




कर्मचाऱ्यांच्या सहकार्यातून सखोल स्वच्छता मोहीम राबवण्यात येत आहे. सर्वसामान्य प्रवाशांना स्वच्छ व सुंदर बसस्थानक तसेच निर्जंतुक, टापटीप प्रसाधनगृहे कायमस्वरूपी उपलब्ध करून देणे हे एस. टी. महामंडळाचे प्रथम कर्तव्य आहे. यावर्षीही हे बसस्थानक स्पर्धेत असून आज हिंदू हृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे स्वच्छ व सुंदर व स्थानक अभियान अंतर्गत मूल्यमापन समिती प्रमुख तथा प्रादेशिक व्यवस्थापक पुणेच्या ताम्हणकर, प्रादेशिक सांख्यिकी अधिकारी पुणे गाढवे, प्रवासी मित्र अमोल गीते व पत्रकार सिद्धार्थ तायडे या ४ सदस्यांनी मूल्यमापन केले. प्रवाश्यांना दिल्या जाणाऱ्या सुखसोयी आदी विषयांची पाहणी करून मूल्य मापन केले. या वेळी आगार व्यवस्थापक सुभाष भिवटे, बसस्थानक प्रमुख नरेश खंडारे, वाहतूक नियंत्रक विनय बोदडे, वाहतूक नियंत्रक नुतिवार यांनी समितीला सहकार्य केले.

# कर्तव्यात कसूर, महावितरणचा सहाय्यक अभियंता निलंबित

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०यवतमाळ –**

वादळ वाऱ्यासह मुसळधार पावसासारख्या नैसर्गिक आपत्तीतही वीज ग्राहकांना वाऱ्यावर सोडून मुख्यालयी न थांबणे, तसेच वरिष्ठांच्या पत्राला उत्तर न देणे, वीज बिल वसुलीत हयगय करून महावितरणचा महसूल गोठविणे आणि महावितरणच्या सेवेबाबत असलेल्या निष्काळजीपणामुळे दारव्हा




ग्रामीण वितरण केंद्र -२ येथील सहाय्यक अभियंता राहुल डोंगरे यांना महावितरणच्या सेवेतून निलंबित करण्यात आले आहे. अधीक्षक अभियंता यांनी ही कारवाई केली आहे.

यंदा मान्सूनच्या आगमनापूर्वीच जिल्ह्यासह राज्यात मुसळधार पावसासह वादळ वाऱ्याची दररोज हजेरी सुरू आहे. या पार्श्वभूमिवर महावितरणने हाय अलर्ट जारी केला असून आपत्ती व्यवस्थापन नियंत्रण कक्षाची परिमंडळ स्तरावर स्थापना केली आहे. तसेच वादळ वाऱ्यामुळे खंडित झालेला वीज पुरवठा तातडीने दुरूस्त करता यावा, यासाठी पूर्व परवानगीशिवाय कोणीही मुख्यालय सोडू नये, असे स्पष्ट आदेश देण्यात आले आहे.

# अकरावीकरिता ३,२०५ विद्यार्थ्यांची नोंदणी

## ऑनलाइन प्रवेशप्रक्रियेला सुरुवात ४१ हजार १८० जागा रिक्त



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०अमरावती**

अकरावी प्रवेशप्रक्रियेला सोमवार, २६ मेपासून सुरुवात करण्यात आली. ४१ हजार १८० जागांकरिता प्रवेशप्रक्रिया राबविली जात असून ३२०५ विद्यार्थ्यांनी आतापर्यंत नोंदणी केली आहे. ३ जूनपर्यंत ही प्रक्रिया चालणार आहे.

जिल्ह्यासह राज्यात प्रथमच अकरावीची ऑनलाइन प्रवेशप्रक्रिया राबविण्यात येत आहे. गतवर्षी महापालिका क्षेत्रात ऑनलाइन प्रवेश स्वीकारण्यात आले. यंदा मात्र प्रवेशप्रक्रियेत बदल करण्यात आला आहे. जिल्ह्यातील ३१० कनिष्ठ महाविद्यालयात एकूण ४१ हजार १८० जागा विद्यार्थ्यांना उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. यामध्ये सर्वात जास्त कला शाखेच्या १८ हजार ६० जागा असून वाणिज्य शाखेच्या १८ हजार ६० जागा असून वाणिज्य शाखेच्या सर्वात कमी म्हणजे ५ हजार ८६० जागा आहेत. पहिली फेरी २६ मे ते १८ जूनपर्यंत चालणार आहे.

२० जूनपासून दुसऱ्या फेरीला सुरूवात होईल. वेळापत्रकानुसार २६ मे ते ३ जूनदरम्यान विद्यार्थ्यांना प्रवेश अर्ज दाखल केले जात आहे.तीन दिवसांत३,२०५ विद्यार्थ्यांनी प्रवेशाकरिता नोंदणी केली आहे. ५ जून रोजी तत्पूर्वी सर्वसाधारण गुणवत्तायादी जाहीर केली जाईल.६ ते ७ जूनदरम्यान यारव आक्षेप स्वीकारून सुधारीत व अंतिम गुणवत्तायादी ८ जून रोजी प्रसिध्द केल्या जाईल. ९ ते ११ जूनदरम्यान शून्य फेरी, कनिष्ठ महाविद्यालयाची निवड व वाटप करणे, ११ ते १८ जूनदरम्यान विद्यार्थ्यांना दिलेले महाविद्यालय मान्य असल्यास प्रवेश प्रक्रिया राबविली जाणार आहे.

# मोर्शीकरांची फसवणूक; आरोग्य धोक्यात; मिनरल वॉटरच्या नावावर दुषित पाणी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०मोर्शी**

शहरात परिसरात अनेक घरांमध्ये विहिरी किंवा बोरींग केलेल्या पाण्याचा व्यवसाय करताना कुठल्या नोंदणी प्रमाणपत्र नसलेल्या कॅन मध्ये नळाचे पाणी भरून मिनरल वाटरच्या नावाखाली थंड पाणी कॅन मध्ये भरून विकत आहे.शासनाचे नियम धाब्यावर बसून शहरात तसेच परिसरात दररोज लाखो लीटर कॅनमध्ये भरून पाण्याची अनधिकृत विक्री होत आहे. नागरिकाच्या जिवाशी खेळणारे अनेक दुकानदार शहरात कार्यरत असून याकडे संबंधित विभागाचे दुर्लक्ष होत




आहे.आरोग्यास हानिकारक अपायकारक ठरणारे पाणी व भूगर्भातून अमर्याद पाणी उपसा करणारे पाणी प्रकल्प बंद करण्याचे आदेश महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने कोणत्याही प्रकारची परवानगी न घेता. प्रत्येक हॉटेलवर, लग्नकार्य, पानटपरी तसेच घरोघरी मीनरल वॉटरचा सर्रास वापर केला जात आहे. ३० रुपयांमध्ये वीस लिटरची स्वस्त थंड पाण्याची कॅन मिळत असल्याने ग्राहकाकडून विचार न करता आरओचे पाणी कॅन खरेदी केले जाते: मात्र काही जार उत्पादक मशीनद्वारे पाणी थंड करून त्यात लिक्विड मिसळत आहे. त्यामुळे हा धोकादायक प्रयोग किडनी आणि हृदयाच्या कार्यक्षमतेवर विपरीत परिणाम करत असून आरोग्य समस्याच्या कारणीभूतठरू शकतो. तेव्हा आरोग्य समस्यांना कारणीभूत ठरू शकतो. तेव्हा या पाण्याची तपासणी करणे गरजेचे आहे; परंतु प्रशासन याकडे कुठल्याच प्रकारची तपासणी केल्या जात नाही महाराष्ट्र जीवन प्राधिकरण तसेच अन्न प्रशासन विभागदेखील या होत असलेल्या पाण्याच्या गोरखधंदाला कोणाचे पाठबळ आहे. यामुळे शहरात अनेकांचे आरोग्य धोक्यात आहे. या अशा कुठलीच शासनाची परवानगी न घेता तसेच आरोग्याला कारणीभूत ठरणाऱ्या या जारच्या पाण्याला विक्री करणाऱ्या बंदी घालण्यात यावी, तसेच योग्य ती तपासणी करून पाणी विक्रीला परवानगी द्यावी, अशी नागरिकांची मागणी आहे.

# अचलपुरात मद्यपींचा धुमाकूळ : महिला त्रस्त पोलिसांचे दुर्लक्ष

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०अचलपूर**

अचलपूर येथे वेगवेगळ्या भागात मध्यपीनी अक्षरशः धुमाकूळ घातला असून त्यामुळे महिलावर्ग व शांतिप्रिय नागरिक त्रस्त झाले आहेत. पोलिसांचे याकडे जाणून बुजून दुर्लक्ष असून वरिष्ठांनी या प्रकरणी लक्ष घालून मद्यपींचा बंदोबस्त करावा अशी मागणी जनतेतून होत आहे.

अचलपूर हे शहर गोरगरिबांचे शहर म्हणून ओळखले जाते. या ठिकाणी बहुतांशी मजूर वर्ग आहे. त्यामुळे महिला आणि पुरुष दोन्हीही कष्टकऱ्याचे काम करत असतात. संध्याकाळी काम करून थकून आल्यानंतर झोप व आरामाची गरज असते.परंतू रात्री ८ वाजेनंतर मद्यपींचा धुमाकूळ सुरु होतो. त्यामुळे त्यांना रात्रीचा आराम करणे कठीण झाले आहे.मद्यपी मद्य प्राशन केल्यानंतर जोरजोरात शिवीगाळ करणे, एखाद्याला मारायला धावणे,



एखाद्या शांतप्रिय नागरिकांना तथा महिलांना अश्लील शिवीगाळ करणे, आक्षेपार्ह हातवारे करणे, एखादयाच्या घरात घुसणे, यामुळे नागरीक तथा महिला त्रस्त झाले आहेत पोलीस मात्रया संदर्भात कारवाई करायला तयार असल्याचे दिसत नाही.सदर मद्यपींचा धुमाकूळ जुना कचरा डेपो, नामदार गंज, बेगमपुरा, गांधी पूल, दुल्हागेट, खिडकी गेट, देवडी, चित्रपटगृहरोड, जीवनपुरा, विदर्भ मिल स्टॉप, सरायपुरा, दिलदिलदापुरा, बिलनपूरा, विलायत पुरा, श्रीकृष्ण पुल यांसह सार्वजनिक ठिकाणी असतो. पोलीस मात्र यामध्ये बोटचेपे धोरण स्वीकारत असल्याचे दिसून येत असते.या संदर्भात स्थानिक पोलीस कुठलीही कारवाई करत नसल्याने वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी याप्रकरणी लक्ष घालून मद्यपींच्या मुसक्या बांधाव्या व ज्या भागात मध्ये धुमाकूळ घालतात भागातील बिट त्या जमदार यांच्यावरही कारवाई करून ठाणेदारांना समज देण्यात यावी, अशी मागणी जनतेकडून होत आहे.

# घरफोडी करणारा अट्टल चोरटा गजाआड

## दोन दुचाकीसह १ लाख ३० हजार रूपयांचा मुद्देमाल जप्त : राजापेठ २ व खोलापुरी गेट २ असे ४ गुन्ह्यांची दिली कबुली

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०अमरावती**

घरफोडी करणाऱ्या अटल चोरट्यास राजापेठ पोलिसांनी अटक करून त्याच्याकडून दोन दुचाकीसह १ लाख ३० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

दुचाकी क्रमांक एम. एच. २७सी.जी. ८४८९ कि. अंदाजे ४०,०००/रु.ची कामाचे ठिकाणाहून पार्किंग मधून चोरी गेल्याची तक्रार राजापेठ पोलिसात दाखल करण्यात आली होती. या प्रकरणाचा तपास सुरू असताना गुप्त बातमीदाराकडुन मिळालेल्या माहिती नुसार आरोपी सुदेश गणेशराव नाईक वय २५ वर्ष




रा. खरकाडीपुरा अमरावती यांचेकडुन दुचाकी क्रमांक एम. एच. २७ सी. जी.८४८९ कि. अंदाजे ४०,०००/रु. ची ही जप्त करण्यात आली. तसेच आरोपीने चौकशीमध्ये इतरही तीन गुन्ह्यांची कबुली दिली. या चारही गुन्हयातील मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.पो. स्टे. खोलापुरी गेट मधील चोरी गेलेली दुचाकी क्र. एम. एच. २७ बी. वाय. ९२५५ शाईन कि अं. ४०,००० रु. तसेच एक सोनी कंपनीचा एलईडी टि.व्ही. ४७ इंची की. २०,००० रु, एक इन्डेन कंपनीचा गॅस सिलेंडर की. १००० रुआणि पो. स्टे. राजापेठ मध्ये चोरी गेलेल्या ०३ नवीन साइया किंमत अदांजे ९००० रुपये, व एक लिनोवो कंपनीचा सिल्वर रंगाचा लॅपटॉप की. ३०हजार रुपये असा एकुण १,३०,००० रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.पोलीस स्टेशन राजापेठ परिसरात २ व खोलापुरी गेट परिसरात २ असे एकूण चार घरफोडीचे गुन्हे उघडकीस आणले.ही कारवाई पोलीस आयुक्त अरविंद चावरीया, पोलीस उपायुक्त गणेश शिंदे, सहायक पोलीस आयुक्त जयदत्त भवर याचे मार्गदर्शनाखाली पो. स्टे. राजापेठचे पोलीस निरीक्षक पुनीत कुलट यांचे नेतृत्वात पोउपनि मिलीद हिवरे, पोहेकों सागर सरदार, पवन तिवारी, दिनेश भिसे, संजय कडु, वकील शेख, अंकुश काळे, सुरज मेश्राम यांनी केली आहे.

# वढनेरच्या ग्रामसेवकाची बदली करा; सरपंचासह सदस्यांची तक्रार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०शिंदी बु.**

ग्रामसेवक अर्जुन पवार हे बाहेर गावी राहत असल्याने त्यांना अप-डाऊन करावे लागते यामुळे ते आठ दिवसांतून एकदोन दिवस येतात. ग्रामसेवक पवार हे सदस्यांसह सरपंचांनाही कुठल्याही प्रकारची माहिती देत नाहीत. जमा-खर्च हिशेब दाखवत नाहीत, सरपंच, उपसरपंच, सदस्यांना विश्वासात घेत नसल्याचाही आरोप तक्रारीद्वारे करण्यात आला आहे.

अचलपूर पंचायत समिती अंतर्गत येणाऱ्या ग्रामपंचायत वढनेर भुजंग



> अतिक्रमीत जागा नियमाकुल करण्याचा प्रस्ताव जाणूनबुजून उशिरा पाठवणे, पदाधिकाऱ्यांना विश्वासात न घेणे तसेच कधी ही येणे-जाणे यामुळे ग्रामपंचायतचा कारभार चालविणे कठीण झाले आहे. म्हणून अशा अकार्यक्षम ग्रामसेवकांची बदली करावी. यासंदर्भात बिडीओसह संबंधिताना तक्रारी केल्या आहेत.
>
> **सौ. योगिता विधळे, सरपंच.**

येथील येथील ग्रामसेवक अर्जुन पवार हे नेहमी सरपंच व सदस्य यांना विश्वासात न घेता स्वता ज्या मर्जीने काम करतात. तसेच गावातील नागरिकाच्या नेहमी त्यांच्या विषयी तक्रारी असतात. कोणतेही काम वेळेत होत नाही, त्यामुळे गावाच्या विकासाची गती थांबली आहे. यामुळे सरपंच सदस्य यांना गावकल्यांच्या रोष्याला समोर जावे लागत आहे. अशा परिस्थितीत ग्रामपंचायत चालविणे अत्यंत कठीण झाले आहे. यामुळे अशा मनमानी आकार्यक्षम ग्रामसेवकांची तात्काळ बदली करावी, अशी मागणीसरपंचा योगिता विधळे, सदस्या राणीताई मेहेंगे, मीनाताई गुजर, दीपालीताई घोम, सदस्य प्रतीक कारंजकर, स्वप्नील वानखडे यांनी यासंदर्भात गटविकास अधिकारी पं. स. यांच्याकडे तक्रार दाखल केली आहे.

# अमरावती विद्यापीठात जनरल फंडावर ५० लाखांचा डल्ला? 'ओव्हरटाईम' थकबाकीसाठी दबाव

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३० अमरावती**

राज्य सरकारने काही वर्षापूर्वी बंद केलेल्या सुटी कामभत्त्याच्या सातव्या वेतन आयोगाच्या संदर्भाने थकबाकी मिळावी, यासाठी संत गाडगेबाबा अमरावतीविद्यापीठात प्रशासनावर दबाव वाढला आहे. त्यामुळे जनरल फंडाला सुमारे ५० लाखांचा चुना लागणार असून 'प्रशासन'तून निवृत्त झालेल्या एका 'प्रवीण' अधिकाऱ्याच्या सुपीक डोक्यातून ही लूट करण्याचा डाव पुढे आला आहे. तर स्वार्थापोटी काहींनी त्यास मूक संमती दिल्याची माहिती आहे.




अमरावती विद्यापीठात कर्मचारी व अधिकाऱ्यांना सुटी काम भत्त्याची योजना १२ वर्षांपूर्वी सुरू झाली. सुटीच्या दिवशी येऊन ४४ दिवस काम केल्यास २२ दिवसांची सुटी व २२ दिवसांचा पगार ओव्हरटाईम स्वरूपात वर्षअखेरीस मिळते. यात कुलसचिवांपासून परीक्षा नियंत्रकांपर्यत सर्व अधिकारी व कर्मचारी जानेवारी महिन्याची वाट बघतात. अगोदरच्या वर्षाचा जवळपास महिन्याच्या पगार एवढा ओव्हरटाईम उचलतात. यावर विद्यापीठ फंडातून दरवर्षी एक ते दीड कोटी खर्च होतो. वास्तविक राज्य सरकारी कर्मचाऱ्यांना ओव्हर टाईम लागू नाही. असे शासनाचे सूत्र आहे. परंतु 'तेरी भी चूप, मेरी भी चूप' या न्यायाने विद्यापीठात सगळेच या योजनेचा आजवर लाभ घेतात.

### कुलगुरूंच्या निर्णयाकडे लागले लक्ष

सातवा वेतन आयोग लागू झाला नसताना अधिकारी, कर्मचारी मात्र नियमबाह्य ओव्हरटाईमची थकबाकी घेण्याकरिता एकवटले आहेत. कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते या प्रकरणात काय निर्णय घेतात, हे पाहावे लागणार आहे.

# ग्रामीण भागात हागणदारी मुक्तीचा फज्जा! योजना केवळ अधिकाऱ्यांच्या कागदोपत्रीच प्रत्येक्षात मात्र वेगळच चित्र



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०चांदुर बाजार**

शासनाने ग्रामीण भागात स्वच्छ भारत मिशन राबवून जनतेच्या सुदृढ आरोग्यासाठी गावे हागणदारीमुक्त करण्याचा प्रयत्न केला आहे. त्यासाठी प्रत्येक कुटुंबाला घर तेथे शौचालय संकल्पना राबवून अनुदानाची रक्कम देत शौचालये बांधून दिली. मात्र, आजही घरात शौचालय असताना ग्रामीण भागात गावखेड्यातील नागरिक उपडद्यावर शौचास जताना दिसतात. परिणामी हगणदारी मुक्तीचा फज्जा ग्रामीण भागात उडाल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे हागणदारी मुक्त गांव योजना ही केवळ कागदोपत्री असल्याचे चित्र तालुक्यातील ग्रामीण भागात पहावयास मिळत आहे.

तालुक्यातील बहुतांश गावांमध्ये घरी शौचालय असूनही त्याचा वापर केला आत नसल्याने उघड्यावर शौचास बसण्यामुळे परिणामी आज मितीला, गावखेड्यात घाणीचे साम्राज्य पसरल्याने दुर्गंधी वाढली आहे. या दुर्गंधीमुळे रोगराई वाढून साथीचेआजार, डायरिया, चिकनगुनिया, मलेरिया व डेंग्यूसारख्या आजारात ग्रामीण भागात वाढ होण्याची शक्यता आहे. शासनाने स्वच्छ भारत, मिशन अंतर्गत स्वच्छ -गाव योजना राबविण्याचे - फर्मान सोडले. शौचालय बांधकामासाठी १२ हजार अनुदानसुद्धा दिले जाते. परंतु संख्या अजून कमी झालेली नाही उघड्यावर शौचास बसणाऱ्याऱ्यांठीसंख्या अजूनही कमी झालेली नाही.गतकाळात शासनाने हागणदारी मुक्तीचा नारा देत सर्वत्र जनजागृती केली. जनतेचे आरोग्य सुद्ध राहावे, या दृष्टिने ही संकल्पना महत्वाची असल्याचे जिल्हा परीषद, पंचायत समिती ग्रामपंचायतीना पटवून देण्यात आले. शासनाने कोणीही उघड्यावर शौचास जावू नये, यासाठी प्रत्येक कुटुंबाला शौचालयासाठी अनुदान उपलब्ध करून दिले. तसेच ग्रामीण भागात पंचायत समिती व ग्रामपंचायत अंतर्गत मोठ्या प्रमाणात जनजागृती करण्यात आली गुडमॉर्निंग पथक नेमण्यात आले. या पथकाद्वारे दररोज सकाळी फेरफटका मारुन जनतेमध्ये जनजागृती करण्याच्या सूचना केल्या. त्यासाठी हागणदारीमुक्त गावांना पुरस्कृतही करण्यात आले. परंतु, हे अभियान काही दिवसापुरतेच मर्यादीत राहिल्याचे दिसून येते.

आज स्थितीत कोणत्याही गावात हागणदारीची संकल्पना प्रत्यक्षात कुणीही अंमलात आणताना दिसत नाही तसेच गुडमॉर्निंग पथक कार्यरत असल्याचे जाणवत नाही. त्यामुळेच की काय ग्रामीण भागात उघड्यावर शौचास जाणाऱ्यांची संख्या दिवसागणिक वाढत आहे. एकूणच प्रशासनाच्या दुर्लक्षित भुमिकेमुळे स्वच्छता अभियानाचे व हागणदारी मुक्तीचे तीनतेरा वाजले आहेत. तेव्हा ग्रामीण भागात खरच हगणदारीमुक्ती करायची असेल तर प्रशासनाला ओमाने आणि निरतर काम करावे लागेल. जेणेकरून गावखेड्यात आरोग्याचा प्रश्न निर्माण होणार नाही, असे ग्रामीण भागातील नागरिकांचे मत आहे.

# स्वतंत्र महामंडळाच्या मागणीसाठी फासे पारधी समाजाचा आमदार रवी राणा यांच्या निवासस्थानी ठिय्या आंदोलन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०अमरावती**



फासे पारधी समाजासाठी स्वतंत्र आर्थिक महामंडळ स्थापन करण्याच्या मागणीसाठी मतीन भोसले यांच्या नेतृत्वात समाजबांधवांनी आमदार रवी राणा यांच्या गंगा सावित्री निवासस्थानी ठिय्या आंदोलन केले. फासे पारधी समाज अद्यापही मुख्य प्रवाहापासून दूर असून त्यांच्या शैक्षणिक, सामाजिक व आर्थिक प्रगतीसाठी सरकारने ठोस पावले उचलावी, अशी मागणी यावेळी करण्यात आली. राज्यात इतर समाजांसाठी आर्थिक महामंडळे स्थापन करण्यात आली असताना फासे पारधी समाजासाठी अद्यापही स्वतंत्र महामंडळ स्थापन करण्यात आलेले नाही, याकडे आंदोलकांनी लक्ष वेधले. समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी १५०० कोटी रुपयांची तरतूद करावी व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत बैठक आयोजित करण्यात यावी, अशीही जोरदार मागणी यावेळी करण्यात आली. आंदोलनस्थळी आमदार रवी राणा यांनी आंदोलकांशी संवाद साधला. त्यांनी मुख्यमंत्री आणि आदिवासी विकास मंत्री यांच्याशी यासंदर्भात चर्चा केल्याचे सांगत सकारात्मक प्रतिसाद मिळाल्याची माहिती दिली. त्यामुळे आंदोलन तात्पुरते स्थगित करण्यात आले. तथापि, मागण्या मान्य न झाल्यास पुन्हा आंदोलन उभारण्याचा इशारा मतीन भोसले यांनी दिला. यापुढील वेळेस आम्ही आमदार राणा यांच्या निवासस्थानाबाहेर धोपटी आंदोलन करू, मुक्कामी राहू व तिथेच झोपू, असा इशारा त्यांनी दिला.

# दर्यापूर पंचायत समितीने केला दोन दिवसात ४९७ लाभार्थ्यांना निधी वाटप

## २ कोटी ५७ लाख ८५ हजार रुपये निधीचे तात्काळ वाटप : शिवसेना जिल्हाप्रमुख गोपाल पाटील अरबट यांच्या आंदोलनाला मोठे यश

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०दर्यापूर**




गेल्या तीन ते चार महिन्यांपासून घरकुल योजनेचे लाभार्थी यांना घरकुल कामाचा हप्ता वेळेवर देत नाही व त्यासाठी ग्रामीण गृह निर्माण अभियंता हे त्रास देत असल्याच्या अनेक तक्रारी शिवसेना जिल्हाप्रमुख गोपाल पाटील अरबट यांच्याकडे आले होत्या या सर्व लाभार्थ्यांना सोबत घेऊन सोमवार रोजी पंचायत समिती येथे मोठे आंदोलन करत अधिकाऱ्यांना चांगलेच धारेवर धरले व गटविकास अधिकारी यांचा सुद्धा त्यांनी समाचार घेत कामाची जाणीव करून दिली.आजच्या आजच या लाभार्थ्यांना घरकुलाचे हप्ता द्यावा अशी मागणी शिवसेना जिल्हाप्रमुख गोपाल पाटील अरबट यांनी केली होती व काम न करणाऱ्या अधिकाऱ्यांना उलटे टांगण्याची धमकी दिली व ठिय्या आंदोलन केले.त्यांच्या या आक्रमक भूमिकेमुळे अधिकारी वर्ग जागृत झाला व त्यांनी तत्काळ काम करत दोन दिवसातच ४९७ लाभार्थ्यांना निधी वाटप केला.यामध्ये ७२ लाभार्थ्यांना पहिला हप्ता १५ हजार प्रमाणे,३२२ लाभार्थ्यांना दुसरा हप्ता ७० हजार प्रमाणे,६६ लाभार्थ्यांना तिसरा हप्ता ३० हजार रुपये,३७ लाभार्थ्यांना चौथा हप्ता ५ हजार प्रमाणे वितरीत केला.असे दोन दिवसात २ कोटी ५७ लाख ८५ हजार रुपये पंचायत समितीने गटविकास अधिकारी यांच्या आदेशानुसार वितरीत केले.तसेच उर्वरित सर्व लाभार्थ्यांना येत्या आठवड्यात निधी वितरीत करण्याचे आश्वासन त्यांनी शिवसेना जिल्हाप्रमुख गोपाल पाटील अरबट यांना दिले आहे.यामुळे सर्व लाभार्थ्यांनी आभार व्यक्त केले.

# यंदा पहिल्या वर्गाला सीबीएसई पॅटर्नची पुस्तके : विद्यार्थ्यांना मिळणार पुस्तकांचा संच

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०अमरावती**

यावर्षीपासून जिल्हा परिषदेच्या शाळेला सीबीएई पॅटर्नची पुस्तके दिली जाणार आहेत. पहिल्या वर्गासाठी या स्वरूपाची मोफत पुस्तके शाळेतील विद्यार्थ्यांना मिळणार आहेत याशिवाय वर्ग २ ते ८ वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना एकात्मिक स्वरूपाची नव्हे. तर स्वतंत्र स्वरूपाची पुस्तके मिळणार आहेत

यावर्षीचे शैक्षणिक सत्र २३ जूनपासून सुरु होणार आहे. तत्पूर्वी १० ते १२ जूनपर्यंत प्रत्येक शाळेला पातचपुस्तक पाठविण्याची तयारी सिक्षण विभागाकडून सुरू करण्यात आली आहे. यासाठी पुणे बालभारती



मंडळाने शाळेची पुस्तके जिल्हा व तालुका स्तरावर पाठविण्याची प्रक्रिया सुरू केली आहे

यापूर्वी संयुक्त स्वरूपाची पुस्तके विद्यार्थ्यांना वितरित करण्यात आली होती. हा प्रयोग यशस्वी न झाल्याने पाठछ्पुस्तक मंडळाने विद्यार्थ्यांना प्रत्येक विषयाचे स्वतंत्र पुस्तक तयार करून पाठविले आहे यामुळे विद्याव्यांना नव्या स्वरूपात पुस्तके पाहायला मिळणार आहेत. पुस्तक हाताळणे विद्याब्यांसाठी सहज होईल

### स्कॅनिंगचा पर्याय

जिल्ह्यातील अनेक शाळा डिजिटल झाल्या आहेत. याशिवाय अनेकांकडे स्मार्ट फोन आहे. जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थी खासगी शाळेच्या तुलनेत मागे पडू नये, म्हणून पाठ्यपुस्तकाचे स्कॅनिंग हा प्रयोग यावर्षीच्या पुस्तकात झाला आहे. यामुळे विद्याव्याना स्कॅनिंग कोडवर स्कैन करताच अतिरिक्त माहिती मिळेल.विद्यार्थ्यांच्या हातात नवीन पुस्तके पोहोचावी यासाठी मे महिन्यापासूनच शिक्षण विभागाने तयारी पूर्ण केली आहे.

# जि.प. च्या आरक्षणाविनाच अनेकांना लागले विजयाचे डोहाळे

## लग्न समारंभ व कार्यक्रमात वाढल्या ईच्छुकांच्या भेटीगाठी






**अरुण जोशी**

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०अमरावती**

सुरुवातीला कोरोना, प्रभाग रचना आणि नंतर ओबीसींच्या राजकीय आरक्षणाच्या मुद्द्यामुळे या निवडणुका लांबलेल्या आहेत. पण, आता, काही महिन्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची शक्यता असल्याने तयारीच्या दृष्टीने तालुक्यातील सर्वच पक्षाचे नेते मंडळीमध्ये उत्साह वाढला असून, आरक्षण व निवडणूक कार्यक्रम लागला नसला तरी अनेक नेतेमंडळी आपली तयारी करताना दिसून येत आहेत. स्थानिक, क्षेत्राबाहेरील नेतेमंडळीच्या भेटीगाठी वाढल्या असून, अनेकांना मिनी मंत्रालयाचे डोहाळे लागल्याचे चित्र बघायला मिळत आहे.

कोरोना काळानंतर मागील तीन वर्षांपासून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचे प्रकरण न्यायालयात सुरू होते. नुकतेच न्यायालयाने निवडणुका चार महिन्यांत घेण्याचे स्पष्ट आदेश दिले. त्यामुळे काही दिवसच शिल्लक असल्याने नेतेमंडळी आतापासूनच कामाला लागले असून, भेटीचे सत्र सुरू झाले आहे. आरक्षण व निवडणूक कार्यक्रम जाहीर झाला नसला तरी अनेकांनी आरक्षणाचा अंदाज बांधत जिल्हा परिषद क्षेत्रात चकरा मारणे सुरू केले आहे.

### नेतेमंडळी सोशल मीडियावर सक्रिय

पुरुष व महिला मंडळीमध्ये स्मार्ट फोनचा वापर वाढल्याने व जास्तीत जास्त डिजिटल मध्यमाचा वापर करताना दिसून येत आहे. आता नेतेमंडळीही स्मार्ट होत कार्यक्रमात, लग्न समारंभात, भेटी गाठी व वेगवेगळ्या प्रकारे काढलेले फोटो, तसेच व्हिडिओ, व्हॉट्सअॅप, फेसबुक, इन्स्टा, टेलीग्राम, या डिजिटल मध्यमाचा वापर करून क्षेत्रातील नगरिकांपर्यंत पोहोचून नागरिकांना आपण चांगले काम करीत असून, चर्चेत व भविष्यात उमेदवारी आपल्यालाच मिळावी याकरिता अशी तजवीज केली जात आहे.

### क्षेत्राबाहेरील उमेदवारांमुळे चिंता

जिल्हा परिषद निवडणूक लढण्याची इच्छा अनेकांची आहे. परंतु, काही संभाव्य उमेदवार विविध कारणाने कमकुवत आहेत, तर काही सर्व बाजूने बळकट दिसत आहे. तसेच काही क्षेत्राबाहेरील उमेदवार येऊन आपली तयारी करताना दिसून येत आहे. त्यामुळे काही स्थानिक संभाव्य उमदेवारांमध्ये नाराजीचा सूर असून, आपणही काही कमी नाही, वेळ पडल्यास बंड करू पण लढू असा सूर उमटत आहे. काहीजण शांत राहून लोकांमध्ये जाऊन काम करीत असल्याचे दिसून येत आहे. अवघ्या काही महिन्यांतच निवडणुका होणार असल्याने सर्व नेते मंडळी आता जनमानसात रमताना दिसून येत आहे.

# पावसाळ्यापूर्वी कौलारू घरे छावणी, दुरुस्तीची वाढली लगबग : ग्रामीण भागात कौलारू घरांची संख्या अधिक

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३० मोर्शी**



मानवाच्या अन्न, वस्त्र, निवारा या तीन मूलभूत गरजांपैकी निवारा ही गरज अतिशय महत्त्वाची आहे. बदलत्या काळानुसार शहरी भागात सिमेंट, कॉंक्रीटची छत असलेली पक्की घरे भरपूर प्रमाणात पाहायला मिळतात. मात्र, गावखेड्यात आजही चंद्रमौळी कौलारू घरांचे अस्तित्व कायम टिकून आहे. ग्रामीण भागात झोपडीवजा मातीची कौलारू घरे अधिक प्रमाणात आहेत. शेती कामासोबतच नागरिक पावसाळ्यापूर्वी कौलारू घरांच्या दुरुस्ती कामात गुंतलेले दिसत आहेत.

अचलपूर, चांदुर बाजार,मोर्शी सह ग्रामीण भागातीलपावसाळयाच्या आगमनापूर्वी कौलारू घरांचे छत छावणी, दुरुस्तीला वेग आला आहे. गावखेड्यात माकडांचा उच्छाद असतो. जंगलातील माकडे गावात येऊन कौलारू घरांच्या छतांचे नुकसान करीत असतात. त्यासाठी पावसाळ्यापूर्वी घरांचे छत दुरुस्ती करणे गरजेचे असते.ग्रामीण भागात अनेक कौलारू घरांची दुरुस्ती करण्यासाठी संबंधितांची लगबग सुरू झाली आहे. पावसाळ्याचे दिवस जवळ आल्याने पावसाळ्यापूर्वी ही कामे आटोपणे गरजेचे आहे. कौलारू घर छावणीचा, दुरुस्तीचा अनुभव काही लोकांनाच असल्यामुळे संबंधित मजुरांची मनधरणी करताना घर मालकाच्या नाकी नऊ येत आहे.पूर्वी कुडा-मातीच्या भिंती व त्यावर गवताचे किंवा कवेलूचे छत असलेली घरे मोठ्या प्रमाणात दिसायची. मात्र, बदलत्या जीवनशैलीनुसार माणसाने आपल्या निवाऱ्यात बदल केला. ग्रामीण भागातही आता मातीच्या घरांऐवजी सिमेंट, कॉंक्रीटची छत असलेली पक्की घरे बांधण्याकडे नागरिक वळू लागले आहेत.

### तीनही ऋतूत अल्हाददायक

ग्रामीण भागात अनेक वर्षापासूनची उभी असलेले जुनी कौलारू घरे आजही पाहायला मिळतात. उन्हाळा, पावसाळा, हिवाळा या तीनही ऋतूत कवेलूंची छत असलेली घरे थंड असून, अल्हाददायक व सोयीस्कर असतात. याउलट, उन्हाळ्याच्या दिवसात सिमेंट, कॉंक्रीटची घरे तापत असतात. शहरी भागात सर्वत्र गगनचुंबी सिमेंट घरांची बांधणी मोठ्या प्रमाणात आहे.

पावसाळ्यात पावसाचे पाणी छतातून टपकून घरात शिरू नये, यासाठी तूट-फूट झालेली कवेलू बदलून त्या ऐवजी नवीन कवेलू बसविणे अशी दुरुस्ती कामे करावी लागतात.

# महाराष्ट्रातील शेतकऱ्यांची बियाण्यांसाठी तेलंगणात गर्दी

## फसवणुकीला बळी पडू नका कृषी विभागाचे आवाहन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०अमरावती**

खरीप हंगामात जिल्ह्यात चोर बिटीच्या माध्यमातून ग्रामीण भागात शेतकऱ्यांची मोठ्या प्रमाणात फसवणूक सुरू आहे. दुसरीकडे, बी-बियाणांसाठी जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी लगतच्या तेलंगणा राज्यातील बेला या गावात गर्दी केल्याचे दिसून येत आहे. यामुळे जिल्ह्यातील कृषी सेवा केंद्रे ओस पडली आहेत. महाराष्ट्राच्या तुलनेत तेलंगणा येथे उच्चप्रतीचे व स्वस्त बी-बियाणे मिळत असल्याने मागील दोन वर्षांपासून सीमावर्ती तालुक्यातील शेतकऱ्यांनी तेलंगणा राज्यातील बेला या गावाकडे आपला मोर्चा वळवला होता. मात्र, एका कृषी केंद्र संचालकाने दिलेल्या माहितीनुसार, आता भद्रावती, वरोरा, चंद्रपूर, ब्रह्मपुरी, मूल, सावली, नागभीड व सिंदेवाही सह विदर्भातील अनेक भागांतील शेतकरीदेखील मोठ्या संख्येने तेलंगणा राज्यातील बेला येथून बी-बियाण्यांची खरेदी करीत आहेत.

दुसरीकडे, बियाण्यांचा काळाबाजारही सुरू आहे. ग्रामीण भागात सक्रिय एजंट कृषी केंद्रांच्या माध्यमातून चोर बीटी शेतकऱ्यांच्या माथी मारत आहेत. राजुरा तालुक्यात पोलीस व कृषी विभागाने संयुक्त कारवाई करीत दीड लाखांपेक्षा अधिक किंमत असलेला अनधिकृत बियाणे साठा जप्त केला. खरीप हंगाम सुरू होण्यापूर्वीच ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणात अनधिकृत कापूस बियाणे दाखल झाले आहे. एजंट शेतकऱ्यांना आमिष दाखवून त्यांची फसवणूक करीत आहे. या फसवणुकीला बळी पडू नका, असे आवाहन कृषी विभागाने केले आहे.


# अमरावतीत पुन्हा कोरोना आला : प्रशासनाने दिला सतर्कतेचा इशारा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०अमरावती**

राज्यातील काही शहरांमध्ये कोरोनाचे रुग्ण आढळून येत असताना, अमरावती शहरातमध्येसुध्दा कोरोनाचा रूग्ण आढळून आल्याने खळबळ उडाली आहे. स्थानिक मंगलधाम कॉलनीतील ५४ वर्षीय महिला कोरोना पॉझिटिव्ह असल्याचा अहवाल आरोग्य विभागाला प्राप्त झाला आहे. त्यामुळे आरोग्य विभाग अलर्ट झाला आहे.

अमरावती शहरातील मंगलधाम कॉलनीतील एक ५४ वर्षीय महिला जिल्हा सामान्य रुग्णालयात उपचारासाठी गेली होती. जिल्हा सामान्य रुग्णालय प्रशासनाच्या सल्ल्यानुसार महिलेने विद्यापीठातील प्रयोगशाळेत जाऊन तेथे कोरोना चाचणी करून घेतली. त्या चाचणीचा अहवाल बुधवारी (ता.२८) आला असून सदर महिला कोरोनाबाधित असल्याचे स्पष्ट झाले आहे. महापालिकेच्या आरोग्य विभागाच्या पथकानेही सदर महिलेच्या घरी जाऊन त्यांना आवश्यक त्या सूचना दिल्या आहेत. तसेच त्यांच्या संपर्कातील व्यक्तींची माहिती घेण्यात आली असून. त्यांचेही घश्यातील लाळेचे नमुने घेतले जात असल्याचे आरोग्य प्रशासनाकडून सांगण्यात आले. दरम्यान, या रूग्णांसाठी जिल्हा सामान्य रुग्णालयातील वॉर्ड क्र.१० हा कोरोना किंवा श्वसनाचा आजार झालेल्या रूग्णांसाठी राखीव ठेवण्यात आला आहे. जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. दिलीप सौंदळे यांनी दिली तसेचवॉर्डची पाहणी करून आवश्यक साहित्य उपलब्ध करण्याच्या सूचना प्रशासनाला दिल्या आहेत.

### मंगलधाम कॉलनीत आढळला रुग्ण




### दहा महिन्यानंतर आढळला कोरोना पॉझिटिव्ह

श्री संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या प्रयोगशाळेत कोरोनाच्या नमुन्याची चाचणी केली जाते. यापूर्वी या प्रयोगशाळेत तपासणीसाठी आलेला शेवटचा कोरोना पॉझिटिव्ह नमुना ऑगस्ट २०१४ मध्ये आढळला होता.. तब्बल दहा महिन्यानंतर अमरावतीत कोरोना पॉझिटिव्ह रुग्ण आढळलेला आहे.